नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २१६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणाच्या सक्तीचा पुनर्विचार करा

### ग्राहकांना १०० टक्के पेट्रोलचा पर्याय द्या : आदित्य ठाकरे यांची पंतप्रधानांकडे मागणी

मुंबई : (स. गांवकरी)

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाची सक्ती करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाचा पुनर्विचार करून वाहनधारकांना १०० टक्के शुद्ध पेट्रोल आणि इथेनॉल-मिश्रित पेट्रोल असे दोन्ही पर्याय उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी शिवसेना नेते ( ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे केली आहे.

आदित्य ठाकरे यांनी लिहिलेल्या पत्रात देशातील लाखो वाहनधारक, विशेषतः युवक आणि मध्यमवर्गीय नागरिकांच्या वाढत्या चिंतेकडे लक्ष वेधले आहे. वाहन खरेदीसाठी अनेक कुटुंबे अनेक वर्षांची बचत करतात किंवा कर्ज काढून ईएमआय भरतात. अशा परिस्थितीत वाहन उत्पादकांनी दिलेली कामगिरी आणि इंधन कार्यक्षमता (मायलेज) मिळावी, अशी ग्राहकांची अपेक्षा असते, असे त्यांनी नमूद केले आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे, पेट्रोलमधील इथेनॉलचे प्रमाण वाढल्यानंतर अनेक वाहनधारक कमी मायलेज मिळत असल्याची आणि वाहनाच्या कार्यक्षमतेवर



परिणाम होत असल्याची तक्रार करत आहेत. देशातील मोठ्या प्रमाणावरील वाहने जास्त इथेनॉल मिश्रित इंधनासाठी मूळतः तयार करण्यात आलेली नसल्यामुळे त्याचा परिणाम वाहनांवर होत असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांना कोणताही पर्याय न देता या धोरणाचे परिणाम सहन करावे लागत असल्याची भावना नागरिकांमध्ये असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

इथेनॉल उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड वाढत असल्याबाबतही आदित्य ठाकरे यांनी चिंता व्यक्त केली आहे. ऊस हे देशातील सर्वाधिक पाणी लागणाऱ्या पिकांपैकी एक असून अनेक राज्यांमध्ये पाणीटंचाईची समस्या गंभीर आहे. त्यामुळे इथेनॉल उत्पादनासाठी ऊस लागवडीवर भर देणे दीर्घकालीन दृष्टीने शाश्वत आहे का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

या धोरणाचा लाभ काही विशिष्ट कंपन्या आणि उद्योगसमूहांना अधिक होत असल्याची जनमानसात भावना असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. ही धारणा योग्य असो वा अयोग्य, सरकारने या सर्व मुद्द्यांवर पारदर्शकपणे भूमिका स्पष्ट करणे आवश्यक असल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

ग्राहकांना निवडीचा अधिकार द्यावा

अनेक देशांमध्ये ग्राहकांना त्यांच्या वाहनानुसार इंधन निवडण्याचे स्वातंत्र्य उपलब्ध असल्याचा उल्लेख करत भारतातही अशीच ग्राहकाभिमुख व्यवस्था लागू करण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यानुसार पेट्रोल पंपांवर १०० टक्के शुद्ध पेट्रोल आणि इथेनॉल-मिश्रित पेट्रोल हे दोन्ही पर्याय उपलब्ध करून द्यावेत, असे त्यांनी सुचविले आहे.

**मध्यमवर्गीय आणि वाहनधारकांच्या हिताचा निर्णय घ्यावा**

ग्राहकांना पर्याय उपलब्ध करून दिल्यास विद्यमान वाहनधारकांची गैरसोय टळेल, ग्राहकांच्या निवडीचे स्वातंत्र्य अबाधित राहील आणि सरकारच्या धोरणांबाबत जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल, असे आदित्य ठाकरे यांनी पत्रात नमूद केले आहे. देशातील मेहनती मध्यमवर्गीय, युवक आणि कोट्यवधी वाहनधारकांच्या हिताचा विचार करून केंद्र सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केली आहे.

## पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार! एका मुलाचा जन्म

मुंबई : (स. गांवकरी)

जेव्हा एखादा पिता स्वतःच्याच मुलीवर लैंगिक अत्याचार करतो, तेव्हा त्याहून अधिक 'धक्कादायक आणि भीषण' गुन्हा असू शकत नाही, अशी टिप्पणी नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने बलात्कार प्रकरणातील आरोपीला कोणताही दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला. बापाच्या या कुकृत्यामुळे पीडित मुलीच्या मनावर कायमस्वरूपी भावनिक आणि मानसिक आघात झाल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांच्या खंडपीठाने १५ जुलै रोजी दिलेल्या आदेशात म्हटले, "बलात्कार हा केवळ एक शारीरिक हल्ला नसून, तो बऱ्याचदा पीडितेचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व उद्ध्वस्त करतो. त्यामुळे अशा स्वरूपाच्या आरोपांची प्रकरणे अत्यंत संवेदनशीलतेने हाताळली पाहिजेत." पुराव्यांचा आधार घेत खंडपीठाने नमूद केले, "आरोपी पीडितेचा जन्मदाता आहे. त्याने मुलीवर अतिशय कोवळ्या वयात लैंगिक अत्याचार केले. पुराव्यांवरून असे दिसून येते की, पीडितेला अत्यंत तीव्र मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. या कृत्यात स्वतःचा पिता सामील असल्याने ती या घटनेबद्दल कोणालाही सांगू शकली नाही. एका मुलाचा किंवा मुलीचा आपल्या वडिलांवर जो अढळ विश्वास असतो, तोच या आरोपीने धुळीस मिळवला. जो बाप एक रक्षक असायला हवा होता, त्यानेच स्वतःच्या मुलीची शारीरिक आणि मानसिक



- दुसऱ्यांदा गर्भवती राहिल्यानंतर प्रकार उघड
- मुंबई उच्च न्यायालयाने सुनावली शिक्षा

अवस्था उद्ध्वस्त करून तिचे संपूर्ण भविष्य अंधकारमय केले." १५ एप्रिल २०२१ रोजी एका आशा कार्यकर्तीने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, १४ एप्रिल रोजी गावात सर्वेक्षण करत असताना त्यांना या पीडित मुलीबाबत संशय आला. १५ एप्रिल रोजी त्यांनी मुलीला गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि नंतर सामान्य रुग्णालयात नेले, तिथे ती २७ आठवड्यांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, चौकशीदरम्यान घाबरलेल्या पीडितेने या लैंगिक अत्याचाराबद्दल काहीही उघड केले नाही. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवल्यानंतर या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार पीडित मुलीचे वडीलच असल्याचे उघड झाले. दरम्यानच्या काळात पीडितेने एका बाळाला जन्म दिला होता. १६ सप्टेंबर २०२१ रोजी पोलिसांनी आरोपीला अटक केली आणि नवजात बाळाची डीएनए चाचणी केली.

## थोडक्यात...

### 'नीट' फेरपरीक्षेचा निकाल जाहीर

पुणे (स. गांवकरी) : वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशांसाठी राष्ट्रीय चाचणी संचलन संस्थेतर्फे (एनटीए) घेण्यात आलेल्या नीट-यूजी फेरपरीक्षेचा निकाल गुरुवारी रात्री जाहीर करण्यात आला. पंजाब आणि हरियाणा येथील अनुक्रमे आर्यन गुप्ता आणि पंशुल बन्सल यांनी ७२० पैकी ७१५ गुणांसह देशात संयुक्त पहिला क्रमांक मिळवला असून, ११.२१ लाख विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. ही परीक्षा आधी मेमध्ये आयोजिली होती, परंतु पेपरफुटीमुळे रद्द होऊन ही पुन्हा घ्यावी लागली. 'एनटीए'ने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकालाबाबत माहिती दिली. नीट फेरपरीक्षा २१ जून रोजी देशभरातील ५५१ शहरातील ५४४० परीक्षा केंद्रांवर १३ भाषांमध्ये घेण्यात आली. सुमारे २० लाख विद्यार्थ्यांनी ती दिली. त्यापैकी ९३ टक्के विद्यार्थ्यांचा हा पहिला प्रयत्न होता. परीक्षेत पात्र ठरलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ५८ टक्क्यांहून अधिक मुली आहेत. निकालातील पहिले १३८ विद्यार्थी ६६ विविध शहरांतील आहेत. तसेच, ७०५ किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवलेले १७ गुणवंत विद्यार्थी पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, तमिळनाडू, तेलंगणा या आठ राज्यांतील असल्याचे 'एनटीए'ने स्पष्ट केले.

### भाजप नगरसेवकांची आरोपांची सरबत्ती

कराड (स. गांवकरी) : कराड येथील नगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पातील विविध विकासकामांमध्ये गंभीर वित्तीय व प्रशासकीय अनियमितता झाल्याचा थेट आरोप पालिकेतील विरोधी भाजपचे गटनेते विजय वाटेगावकर यांनी केला आहे. कचरा प्रकल्प परिसरातील कागदोपत्री पूर्ण दाखवण्यात आलेला बगिचा, रस्ते आणि सुशोभीकरणाची कामे प्रत्यक्ष पाहणीत कुठेही अस्तित्वात नसल्याचा दावा त्यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला आहे. दरम्यान, या प्रकरणी नगराध्यक्ष राजेंद्र यादव यांनी पत्रकार परिषद घेवून निवेदन करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### पेट्रोल पंपाचा परवाना देण्याचे आमिष

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिओ कंपनीचा पेट्रोल पंप व परवाना मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका व्यावसायिकाला तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांचा गंडा घातल्याची घटना अहिल्यानगरमध्ये घडली. यासंदर्भात सायबर पोलिसांनी तक्रार दाखल करून घेत गुन्हा दाखल केला आहे. जिल्ह्यात विविध प्रकारचे आमिष समाज माध्यमावरून दाखवत ऑनलाइन पद्धतीने फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. यासंदर्भात उदय गुलाबराव शिंदे यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानुसार दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सागर ढिकले करत आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार उदय शिंदे यांचे जामखेडमध्ये कृषी सेवा केंद्र आहे. फेसबुकवर त्यांना जिओ कंपनीचा पेट्रोल पंप व परवाना पाहिजे का, अशी विचारणा करणारी जाहिरात सौरभ अग्रवाल यांनी केलेली आढळली. त्याखाली संपर्क साधण्यासाठी लिंकही देण्यात आली होती. उदय शिंदे यांनी या लिंकवर प्रतिसाद दिल्यानंतर सौरभ अग्रवाल व शिंदे इंजिनिअर या नावाच्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी पेट्रोल पंपाची डीलरशिप देण्याचे आमिष दाखवत प्रोसेसिंग फिच्या नावाखाली तसेच इतर वेगवेगळ्या कारणांसाठी ३१ ऑक्टोबर २०२५ ते ८ जुलै २०२६ या कालावधीत दोन वेगवेगळ्या खात्यांवर रक्कम भरण्यास भाग पाडले.

## FDA कारवाईनंतर सियाचे वडील प्रवीण गोयल यांची संतप्त प्रतिक्रिया

पुणे : (स. गांवकरी)

पुण्यातील केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील आरोपी सिया गोयल हिच्या कुटुंबाच्या बी. जी. गोयल अँड कंपनी या दुकानावर राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धाड टाकली. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात भेसळी विरोधात कारवाया करण्यात येत आहेत. अन्नसुरक्षेच्या कथित नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल गोयल कुटुंबाचे दुकान बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. या कारवाईनंतर सिया गोयलचे वडील प्रवीण गोयल यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी संवाद साधताना एफडीएच्या तपासात पूर्ण सहकार्य करणार असल्याचे सांगितले. तसेच आमच्या कुटुंबाला विनाकारण त्रास दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. एफडीएच्या कारवाईच्या अनुषंगाने बोलत असताना प्रवीण गोयल यांनी कुटुंबाला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप केला.



ते म्हणाले, "मी न्यायव्यवस्थेचा आणि कायद्याचा आदर करतो. तपासालाही आम्ही सहकार्य करत आहोत. मात्र तरीही माझ्या कुटुंबाला वारंवार लक्ष्य केले जात आहे. मलाच फाशी दिली जात आहे, असे वाटते. यामुळे माझे कुटुंबीय आणि मी बऱ्याच काळापासून तणावात आहोत." माझी मुलगी दोषी आढळल्यास तिला कठोर शिक्षा द्या. तिला फाशी द्या. मात्र आता आम्हाला असे वाटते की, कुटुंबालाच फाशी देण्यात येत आहे. रोज काही ना काही विषय पुढे करून कुटुंबाला त्रास देण्याचा प्रयत्न होत आहे, असेही प्रवीण गोयल यांनी यावेळी सांगितले.

## आदिवासी विकास विभागाच्या योजनेवर कॅगचा ठपका

### इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील प्रवेशात गंभीर अनियमितता

मुंबई : (स. गांवकरी)

आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांमधील प्रवेश योजनेच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी झाल्याचा ठपका नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांनी ठेवला आहे. अनेक शाळांमध्ये शैक्षणिक व पायाभूत सुविधांचा अभाव असतानाही त्यांचा योजनेत समावेश करण्यात आला होता. तसेच, दुसरीत प्रवेश देण्याची तरतूद असतानाही तब्बल १,९०२ (९४ टक्के) विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित ठेवण्यात आले, असे कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

प्रवेश प्रक्रियेत नियोजनाचा अभाव, रिक्त जागांचे योग्य व्यवस्थापन न होणे आणि पात्र विद्यार्थ्यांना वेळेत प्रवेश न मिळणे या कारणांमुळे योजनेचा उद्देशच



धोक्यात आला आहे. २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत शाळांची संख्या १७६ वरून १५७ पर्यंत घटली, त्यामुळे २०२२-२३मध्ये ४,८८३ इतके प्रवेश अर्ज येऊनही, जागा कमी असल्याने त्यापैकी केवळ २,९१० विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात आले. अहवालात प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींवर बोट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे योजनेचा लाभ मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला नसल्याचे कॅगने नमूद केले आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये दुसरीपासून प्रवेश देण्याची तरतूद असतानाही १,९०२ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला नाही. नियम धुडकावणाऱ्या शाळांवर विभागाने कारवाईही केलेली नाही. त्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी योजनेपासून वंचित राहिल्याचा ठपका कॅगने ठेवला आहे.

शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांच्या आधारे २२ निकषांवर या योजनेकरिता शाळांची निवड केली जाते. शाळांना प्रति विद्यार्थी ५० ते ७० हजार शुल्क सरकारतर्फे दिले जाते. मात्र या शाळांची तपासणी, फेरतपासणी, मुल्यांकन करण्याच्या प्रक्रियेत त्रुटी असल्याचे कॅगचे निरीक्षण आहे. त्यामुळे निकष पूर्ण न करणाऱ्या शाळांचीही योजनेकरिता निवड झाली आहे.

**कॅगच्या शिफारसी**

कॅगने प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याबरोबरच रिक्त जागा वेळेत भरणे, नियमित देखरेख ठेवणे आणि लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे प्रभावी मूल्यमापन करण्याची शिफारस केली आहे.

## चांदोबाचा लिंबला रंगले पहिले उभे रिंगण!

### 'माउलीं'चा गजर, अश्वांची नेत्रदीपक दौड

सातारा : (स. गांवकरी)

'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'माउली माउली'च्या अखंड जयघोषात, टाळ-मृदंगाचा गगनभेदी निनाद आणि अलोट उत्साहात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पहिले 'उभे रिंगण' गुरुवारी दुपारी चांदोबाचा लिंब, तरडगाव (ता. फलटण) येथे अत्यंत दिमाखात पार पडले. आषाढी वारीतील या पहिल्यावहिल्या उभ्या रिंगणाचा नेत्रदीपक थरार आणि अश्वांची अंगावर काटा आणणारी धाव आपल्या डोळ्यांत साठवण्यासाठी लाखो भाविकांनी या परिसरात गर्दी केली होती.

लोणंद येथील दीड दिवसाच्या सुखद मुक्कामानंतर दुपारी साडेबारा वाजता माउलींच्या पादुकांना नैवेद्य दाखवून माध्यान्ह आरती करण्यात आली. त्यानंतर हजारो लोणंदकरांनी डोळ्यांत निरोपाचे भाव आणून पालखीला सरहद्द ओढ्यापर्यंत आणून सोडले. दुपारी एकच्या सुमारास पालखी सोहळ्याने तरडगावच्या दिशेने कूच केली. संत ज्ञानेश्वर महाराजांचा हा रथ दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास ऐतिहासिक 'चांदोबाचा लिंब' या ठिकाणी पोहोचला.

> गेली अनेक वर्षे वारी करतोय, पण चांदोबाचा लिंब येथील उभे रिंगण डोळ्यांसमोरून हटत नाही. अश्व धावला की काळजाचा ठोका चुकतो आणि डोळे आपोआप पाणावतात. वारीचे कष्ट या एका क्षणात पळून जातात.
>
> **- विठ्ठल घुगे, वारकरी, लातूर**

पालखीचे आगमन होताच चोपदारांनी आपल्या हातातील चंदेरी दंड उंचावून इशारा केला आणि काही मिनिटांतच शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वारकऱ्यांच्या रांगा उभ्या राहिल्या. मध्यभागी मोकळ्या ठेवलेल्या मार्गावरून धावण्यासाठी माउलींचे अश्व सज्ज झाले.

अश्वांनी जेव्हा वेग घेतला, तेव्हा उपस्थित लाखो वैष्णवांच्या उत्साहाला उधाण आले. टाळ आणि मृदंगाची गती वाढली आणि हवेत फक्त 'माउली' नावाचा एकच गजर घुमू लागला. हवेत झेपावणाऱ्या अश्वांनी माउलींच्या



रथाला प्रदक्षिणा घालत पादुकांचे दर्शन घेतले. अश्वांची पूजा करून त्यांना गूळ-खोबऱ्याचा नैवेद्य दाखवण्यात आला. या अश्वांच्या टापांची माती आपल्या कपाळी लावण्यासाठी (ललाटी लावण्यासाठी) भाविकांची एकच झुंबड उडाली होती.

हा अभूतपूर्व सोहळा अनुभवल्यानंतर ज्ञानेश्वर माउलींची पालखी पुढील मुक्कामासाठी तरडगावकडे मार्गस्थ झाली. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास पालखीने तरडगावात प्रवेश केला, जिथे ग्रामस्थांनी पालखी रथातून खाली उतरवून खांद्यावर घेत भव्य स्वागत केले.

रिंगण सोहळा झाल्यानंतर परिसरातील मोकळ्या जागेत वारकऱ्यांनी फुगडी, हमामा, हुतूतू, आट्यापाट्या आणि एकीबेकी यांसारखे पारंपारिक खेळ खेळत आनंदोत्सव साजरा केला. या क्रीडा प्रकारांमुळे संपूर्ण परिसर भक्ती आणि ऊर्जेने भारून गेला होता.

## शाळेत गॅस गळतीमुळे घबराट; तीन विद्यार्थिनी रुग्णालयात दाखल

सातारा : (स. गांवकरी)


सातारा शहरातील एका नामांकित विद्यालयात गुरुवारी सकाळी स्विमिंग पूलच्या देखभालीसाठी वापरल्या जाणाऱ्या क्लोरीन वायूच्या सिलेंडरमधून गळती झाल्याने काही काळ गोंधळ आणि घबराटीचे वातावरण निर्माण झाले. वायूच्या तीव्र वासामुळे काही विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास जाणवला. खबरदारीचा उपाय म्हणून शाळा प्रशासनाने सर्व विद्यार्थ्यांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविले. मात्र, त्रास झालेल्या तीन विद्यार्थिनींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेच्या स्विमिंग पूलसाठी असलेल्या क्लोरीन पुरवठा यंत्रणेमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला. यामुळे काही मिनिटांतच परिसरात क्लोरीनचा उग्र वास पसरला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शाळा प्रशासनाने तत्काळ वर्ग रिकामे करत सर्व विद्यार्थ्यांना मैदानावर आणि सुरक्षित ठिकाणी हलवले. वायूच्या तीव्रतेमुळे काही शिक्षकांनाही अस्वस्थता जाणवली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि स्थानिक प्रशासकीय अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी




संरक्षणात्मक उपकरणांचा वापर करून अवघ्या काही वेळात गळती रोखली.

घटनेची माहिती मिळताच पालकांनी शाळेत धाव घेतली. आपत्कालीन परिस्थिती उद्भवली असतानाही शाळेत रुग्णवाहिका किंवा वाहनांची तत्काळ उपलब्धता नसल्याबद्दल पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. श्वास घेण्यास त्रास होणाऱ्या विद्यार्थिनींना रिक्षातून रुग्णालयात न्यावे लागल्याचा आरोप करत पालकांनी शाळा प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या घटनेमुळे शैक्षणिक संस्थांमधील आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था आणि धोकादायक रसायनांच्या साठवणुकीच्या पद्धतीवर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे. 'क्लोरीन गळती अत्यंत अल्प प्रमाणात होती आणि ती तात्काळ नियंत्रणात आणण्यात आली. विद्यार्थ्यांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे. रुग्णालयात दाखल तिन्ही विद्यार्थिनींची प्रकृती उत्तम आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नाबार्ड, महाराष्ट्राचा ४५ वा स्थापना दिन पुण्यात उत्साहात साजरा

पुणे (स. गांवकरी) : पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे १६ जुलै २०२६ रोजी नाबार्ड महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालयाचा ४५ वा स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ निमित्त आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी महिला शेतकरी, महिला-प्रवर्तित शेतकरी उत्पादक कंपन्या (FPOs), स्वयं-सहाय्यता बचत गट (SHGs), प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) आणि ग्रामीण उद्योजकांचा गौरव करण्यात आला. तसेच "Empowering Rural Maharashtra: NABARD 2025-26" या पुस्तिकेचे प्रकाशन आणि चंद्रपूर जिल्ह्यातील महिलांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या बॅकयार्ड पोल्ट्री प्रकल्पावरील माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महिला शेतकऱ्यांना शेतीचा कणा संबोधत राज्य शासनाच्या विविध शेतकरी कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला. कृषी कर्जवाटप, किसान क्रेडिट कार्डचा विस्तार, नैसर्गिक शेती, AgriStack आणि महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर त्यांनी भर दिला. नाबार्डचे मुख्य महाव्यवस्थापक डॉ. ए. व्ही. भवानी शंकर यांनी २०२५-२६ हे वर्ष नाबार्ड महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरल्याचे सांगत, राज्यात ₹३९,३८० कोटींचे व्यवसाय सहाय्य व पुनर्वित्त तसेच ग्रामीण विकासासाठी विविध योजनांद्वारे मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य दिल्याची माहिती दिली.



### उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडून प्रकल्पास शुभेच्छा

मुंबई : ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य शैक्षणिक धोरणानुसार, माननीय शिक्षण संचालक (योजना) श्री.कृष्णकुमार पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, शिक्षण उप संचालक पुणे श्री.राजेश क्षीरसागर साहेब,उपशिक्षण अधिकारी श्री.सचिन अनंतकवळस, उपशिक्षण अधिकारी भाऊसाहेब सरक, यांचा नेतृत्वाखाली नवभारत ,उल्लास - साक्षरता वारी-२०२६- आज बारामती तालुक्यातील काठेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेमार्फत आयोजित, उल्लास,नवभारत साक्षरता वारी प्रकल्पास महाराष्ट्र राज्याचा माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी भेट देऊन नवभारत साक्षरता वारी प्रकल्पास शुभेच्छा दिल्या. उल्लास,नवभारत साक्षरता वारी प्रकल्पाचे कौतुक करत या वारीमध्ये साक्षरता, नशामुक्ती, रस्ता वाहतूक सुरक्षा याबाबत जनजागृती केली जात आहे.यावेळी विभागीय नोडल अधिकारी डॉ. मणिलाल शिंपी यांनी रस्ता सुरक्षा RSP अधिकारी शिक्षक युनिट मार्फत पालकांमध्ये वाहतूक सुरक्षा,वाहतुकीचे नियम पाळणे,अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांमार्फत ट्रॅफिक सेन्स निर्माण होणे आवश्यक आहे याची थोडक्यात सविस्तर माहिती दिली. महाराष्ट्र राज्याचा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी RSP अधिकारी शिक्षक युनिट चा कार्याचेही अभिनंदन केले. RSP अधिकारी युनिट मार्फत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वाहतूक नियमांचे पालन करणे, अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी समाजामध्ये रस्ता सुरक्षा बाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्री माननीय सुनेत्राताई पवार यांनी सांगितले. यावेळी केंद्रप्रमुख अजित नांगरे,जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, शिक्षिका,विद्यार्थी उपस्थित होते.उपसंचालक श्री. राजेश क्षीरसागर यांनी साक्षरता वारी प्रकल्पाचे महत्व सर्वत्र समजण्यासाठी नियोजन व विविध घटकांबद्दल मार्गदर्शन केले. यूट्यूबर ,स्वयंसेवक श्री. राजेंद्र जगे, ह. भ. प.श्री.गणेश महाराज भगत, जोशी महाराज, राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान विभागीय नोडल अधिकारी डॉ.मणिलाल शिंपी RSP अधिकारी शिक्षक श्री. संजय खैरनार उपस्थित होते.



### क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी कटिबद्ध असल्याची उपमहापौरांची ग्वाही

- खेळाडूंच्या वतीने फुटबॉल विश्वचषकाची प्रतिकृती देऊन सन्मान

पुणे (स. गांवकरी) : पुणे शहराला उत्तम खेळाडूंची दैदीप्यमान परंपरा आहे. ही परंपरा कायम राखण्यासाठी आणि क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी दिली. फिफा फुटबॉल विश्वचषक 2026 निमित्त गेम ऑफ गोल एफसीसी अकादमीच्या वतीने खेळाडूंना प्रोत्साहन देण्याची भूमिका सातत्याने घेतल्याबद्दल वाडेकर यांचा विश्वचषकाची प्रतिकृती देऊन सन्मान करण्यात आला. अकादमीचे प्रशिक्षक सुशील जोसेफ यांच्या हस्ते ही प्रतिकृती देण्यात आली. यावेळी विठ्ठल गायकवाड, बाबासाहेब कांबळे, नवनीत सिंग गांधी, मनन त्रिवेदी, अशोक शेळके, बाळू सोरटे आदी मान्यवरांसह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातून उत्तम खेळाडू घडवण्यासाठी पायाभूत सुविधा, प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याबद्दल आपण कायम सतर्क राहू. विशेषतः खडकी, दापोडी, बोपोडी परिसराला फुटबॉल आणि हॉकी या खेळांची मोठी परंपरा आहे. या खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी या परिसरात सर्व सुविधांनी सुसज्ज स्टेडियम उभारत असल्याचेही वाडेकर यांनी यावेळी सांगितले. फुटबॉल विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्याच्या दोन्ही संघांना त्यांनी पुणेकरांच्या वतीने शुभेच्छाही दिल्या. वाडेकर यांनी सातत्याने खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबले आहे. त्यांच्या सहकार्याने खडकी परिसरात क्रीडा क्षेत्राचा मोठा विकास होईल, असा विश्वास जोसेफ यांनी व्यक्त केला.

## शिवचंद्र सामाजिक संस्थेचे कार्य कौतुकास्पद

### जगद्गुरु डॉ मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांचे गौरवोद्गार

सोलापूर : (स. गांवकरी)



शिवचंद्र सामाजिक संस्थेचे प्रमोद मोकाशी व त्यांचे बंधू गुरुशांत यांचे कार्य कौतुकास्पद असून फक्त शैक्षणिक मदत नसून सर्व शासकीय योजनेचे लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचं काम मोकाशी बंधू करतात असे गौरवोद्गार काशी पिठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांनी काढले.

प्रारंभी महास्वामी व तपोरत्न योगीराजेंद्र यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मोकाशी मित्र परिवार कडून जगद्गुरु यांचा सत्कार करण्यात आला. स्वर्गीय राजेश कोठे यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन झाले. चंद्रशेखर कळमणकर, मल्लिनाथ मसरे, सुधीर थोबडे, बिप्पीन धुम्मा, रेवणसिद्ध आवजे, केदार मेंगाणे, प्रवीण वाले, मनिष मसरे यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

ऍड. मिलींद थोबडे यांचा गोवा बार कौन्सिलवर सलग तीन वेळा निवडून आल्याबद्दल व ग्रीन मिशन संस्थापक डॉ सूर्यप्रकाश कोठे यांचे एक घर एक झाड या उपक्रमबद्दल शिवचंद्र सामाजिक संस्था व होटगी मठाकडून काशी पिठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

10 वी विद्यार्थ्यांमध्ये शंभर टक्के घेतलेले गुणवंत विद्यार्थ्यां सई पिपंळणेकर, अर्णव राऊत, नितीशा मेंगाणे, साक्षी मेंगाणे, 12 वी मध्ये सुकन्या साखरे, अदिती हद्रे यांचाही सत्कार ही करण्यात आला. या कार्यक्रमात एकूण 31 विध्यार्थी यांना स्कूल बॅग व सन्मान चिन्ह देउन गौरव करण्यात आले. इयत्ता 5 ते 10 मध्ये शिकणारी 150 विध्यार्थी यांना वह्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सारंग मसरे, गुरुशांत मोकाशी, निलेश मसरे, अमोल साखरे, सूर्यकांत सातभाई, बसवराज दर्गोपाटील, लक्ष्मण कलगते, दीपक सातभाई, विष्णू जोशी, शिवराज हिंगमिरे, केदार मसरे, चिदानंद मसरे, श्रीकांत जोकारे, सचिन सूर्यवंशी, राहुल मसरे, महादेव नागशेट्टी, सुनील हिरेमठ, सागर दीक्षित, शंकर सातभाई, केदार कुताटे यांनी प्रयत्न केले.

## नियोजन शून्य कामामुळे वाहतूक कोंडी व अपघाताची भीती



भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी, अंजुर फाटा चिंचोटी रस्त्याची सध्या प्रचंड दुरावस्था झाली असून अंजुर फाटा रस्त्यावरील ७२ गाळा ते खारबाव पर्यंत या रस्त्यावर एक तर्फी मार्गीकिचे कॉंक्रिटीकरणाचे काम ठेकेदाराकडून करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या एकतर्फी कॉंक्रिटीकरणाच्या कामात ठेकेदाराने नागरिकांच्या सुरक्षिततेची कोणतीही परवा अथवा उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे या मार्गावरून वाहन चालत चालवताना वाहन चालकांना अपघाताची भीती व ठिकठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे. मानकोली अंजुर फाटा ते चिंचोटी या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी ३०० कोटींहून अधिकच निधी शासनाने मंजूर केला आहे.या रस्त्याच्या कामाकडे सुरुवातीला ठेकेदाराने दुर्लक्ष केल्याने काम संथ गतीने सुरु होते.त्यांनतर स्थानिक नागरिकांनी आंदोलन व निवेदने दैक्य नंतर पावसाळ्याच्या तोंडावर ठेकेदाराकडून अंजुरफाटा ते खारबाव पर्यंत एका बाजूच्या कॉंक्रेटकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.मात्र हे काम करतांना सुरक्षेची कोणतीही हमी ठेकेदाराने घेतली नाही.

## रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाईचा बडगा



ठाणे : (स. गांवकरी)

दिवा शहरात रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या दुकानदारांवर आता महापालिकेकडून कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंड आकारला जाणार आहे. तसेच सर्व दुकाने, हॉटेल्स आणि व्यावसायिक आस्थापनांनी आपल्या दुकानासमोर कचरापेटी (डस्टबीन) ठेवावी अशा स्पष्ट सूचना महापालिकेकडून देण्यात आल्या आहेत. परिसरात स्वच्छता राखण्यासाठी आणि रस्त्यावर होणारे कचऱ्याचे साम्राज्य रोखण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. नागरिकांना स्वच्छ व सुंदर परिसर मिळावा, तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याच्या प्रकारांना आळा बसावा, यासाठी महापालिका प्रशासनाने दुकानदारांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. या विषयाची मागणी नगरसेवक अँड. आदेश भगत यांनी सातत्याने पाठपुरावा करून महापालिका प्रशासनाकडे केली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने या मागणीची दखल घेत दुकाने व हॉटेल्समध्ये डस्टबीन ठेवण्याच्या सूचना देण्याबरोबरच रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

## पाल परिसरातील एसआर विशेष पुनरिक्षण मोहिमेचा घेतला आढावा

रावेर : (स. गांवकरी)



तालुक्यातील पाल येथे मतदार यादी विशेष पुनरिक्षण (एसआर) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करून एकही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, तसेच प्रत्येक गावात व्यापक जनजागृती करून शंभर टक्के मतदार नोंदणी पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश आमदार अमोल जावळे यांनी संबंधित अधिकारी, बीएलओ व बीएलओ-२ यांना दिले.

बुधवारी पाल परिसराच्या दौऱ्यावर आलेल्या आमदार जावळे यांनी मतदार यादीच्या एसआर (Special Revision) विशेष पुनरिक्षण मोहिमेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी शासकीय बीएलओ, बीएलओ-२, बीएलओ प्रभारी तसेच भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून नोंदणीच्या कामाची प्रगती जाणून घेतली. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, नवमतदारांची नोंदणी, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल आणि आवश्यक दुरुस्त्यांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी गावोगावी विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. एसआर मोहिमेत कोणतीही दिरंगाई अथवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे सांगत सर्व संबंधितांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करून शासनाने दिलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

यानंतर आमदार जावळे यांनी पाल येथील लक्ष्मण चैतन्य बापूजी आश्रमाला भेट देऊन आगामी गुरुपौर्णिमा उत्सवाच्या नियोजनाचा आढावा घेतला. भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये, तसेच उत्सव शिस्तबद्ध, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पार पडावा यासाठी आवश्यक सर्व नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. त्यानंतर त्यांनी जिल्हा परिषद पीएम श्री मराठी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची पाहणी केली. शाळेतील एकूण ३५३ विद्यार्थी शिक्षण घेत असून, अपुऱ्या वर्गखोल्या आणि काही जीर्ण झालेल्या इमारतींमुळे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी तसेच शिक्षण घेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या समस्येची गंभीर दखल घेत त्यांनी नवीन वर्गखोल्यांच्या उभारणीसाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करून शासनस्तरावर पाठपुरावा करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी मिळविण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करू, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

## राजगुरुनगर-पेठ महामार्गावर संशयास्पद पांढऱ्या पावडरच्या बॅगा

- चौकशीची मागणी, आंदोलनाचा इशारा!

राजगुरुनगर : (स. गांवकरी)



पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील राजगुरुनगर-पेठ परिसरात अज्ञात व्यक्तींनी मोठ्या हायवा किंवा कंटेनर वाहनातून पांढऱ्या रंगाच्या पावडरने भरलेल्या संशयास्पद बॅगा रस्त्याच्या कडेला बेवारस अवस्थेत टाकल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांच्या आरोग्य, पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने वैज्ञानिक तपासणी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार कांतीराम बोऱ्हाडे पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राजगुरुनगर पोलीस ठाणे, अन्न व औषध प्रशासन, अन्न सुरक्षा विभाग, वन विभाग, जिल्हा व तालुका आरोग्य विभाग तसेच महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक ठिकाणी अज्ञात स्वरूपातील पावडरच्या बॅगा टाकणे ही अत्यंत गंभीर बाब असून त्या पदार्थाचे स्वरूप, त्यातील रासायनिक घटक आणि त्यापासून नागरिक, जनावरे, वन्यजीव तसेच पर्यावरणाला कोणता धोका निर्माण होऊ शकतो, याची तातडीने प्रयोगशाळेमार्फत तपासणी होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळाची संयुक्त पाहणी करून संशयास्पद पावडरचे नमुने तपासणीसाठी पाठवावेत, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, टोल नाक्यांवरील वाहनांची नोंद व इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे संबंधित वाहन व दोषी व्यक्तींचा शोध घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

राज्यात सध्या दुधातील भेसळीच्या घटना समोर येत असल्याने या पांढऱ्या पावडरचा त्या प्रकरणांशी काही संबंध आहे का, याचाही निष्पक्ष तपास करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. अन्नभेसळ, रासायनिक प्रदूषण किंवा अन्य कोणतेही बेकायदेशीर कृत्य आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणासंदर्भातील छायाचित्रे व व्हिडिओ पुरावेही संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले असून, आठ दिवसांच्या आत चौकशी करून लेखी अहवाल देण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा जनहितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही कांतीराम बोऱ्हाडे पाटील यांनी दिला आहे.

## शिळफाटा उड्डाणपुलाला 'श्री खरवली देवीचे नाव द्या

ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २९ मधील शिळफाटा परिसरातील ऐतिहासिक व हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री खरवली देवी मंदिराच्या सन्मानार्थ शिळफाटा येथील उड्डाणपुलाला "श्री खरवली देवी उड्डाणपूल" असे नाव देण्याची अधिकृत मागणी नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी केली आहे. शिळफाटा परिसरातील श्री खरवली देवी मंदिर हे अनेक वर्षांपासून ठाणे, कल्याण, डोंबिवली, दिवा तसेच आसपासच्या परिसरातील नागरिकांचे श्रद्धास्थान आहे. स्थानिक नागरिकांच्या धार्मिक भावना, परिसराची ऐतिहासिक ओळख आणि सांस्कृतिक वारसा जपण्याच्या उद्देशाने उड्डाणपुलाला "श्री खरवली देवी उड्डाणपूल" असे नाव देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी अधिकृत प्रस्तावाद्वारे केली आहे. या संदर्भातील प्रस्ताव ठाणे महानगरपालिका आयुक्त मा. सौरभ राव, महापौर शर्मिला पिंपळोळकर, उपमहापौर कृष्णा पाटील, महानगरपालिका सचिव मनीष जोशी, सभागृह नेते हनुमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते शानू पठाण तसेच भाजप गटनेते मुकेश मोकाशी यांना सादर करण्यात आला असून या प्रस्तावाला सर्वपक्षीय पाठिंबा देऊन आगामी महासभेत मंजुरी द्यावी, अशी विनंतीही करण्यात आली आहे. "श्री खरवली देवी हे शिळफाटा परिसरातील नागरिकांचे आराध्य दैवत असून या मंदिराला ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. या उड्डाणपुलाला देवीचे नाव दिल्यास परिसराची ओळख अधिक दृढ होईल आणि हजारो भाविकांच्या भावना जपल्या जातील. हा केवळ नामकरणाचा प्रस्ताव नसून आपल्या सांस्कृतिक परंपरेचा सन्मान करण्याचा प्रयत्न असल्याचे वेदिका पाटील यांनी स्पष्ट केले.



## निर्भीड लेखणीचा आणि निस्वार्थ सेवेचा सन्मान!

- आर्यारवी एंटरटेनमेंट'चा पहिला पुरस्कार सोहळा दिमाखात संपन्न
- 'दैनिक यश सिद्धी'चे संपादक कमलाकर सोनकांबळे यांना "निर्भीड संपादक" पुरस्कार

अक्कलकोट : (स. गांवकरी)

समाजातील तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या निर्भीड पत्रकारांच्या आणि निस्वार्थ समाजसेवकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी 'आर्यारवी एंटरटेनमेंट'च्या वतीने आयोजित पहिला भव्य 'पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य आणि समाजसेवक पुरस्कार सोहळा' रविवारी (१२ जुलै) मुंबईत अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. महाराष्ट्रातील तळागाळातील लेखणीला सलाम हा उदात्त हेतू उराशी बाळगून दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर हॉलमध्ये या प्रेरणादायी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सोलापूरच्या 'दैनिक यश सिद्धी न्यूज'चे संपादक कमलाकर सोनकांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते "निर्भीड संपादक" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.आर्यारवी एंटरटेनमेंट'चे मुख्य आयोजक महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याचा आढावा घेत पाहुण्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले.तर प्रसिद्ध निवेदक डॉ. सूर्यभान डोंगरे यांनी आपल्या ओघवत्या वाणीने उत्कृष्ट सूत्रसंचालन करत उपस्थितांची मने जिंकली. साहित्य व कला क्षेत्र: जगप्रसिद्ध बोलके बाहुलाकार श्रीधर कीर, प्रसिद्ध कवी व साहित्यिक अरुण म्हात्रे, 'कुटुंब रंगलंय काव्यात'चे सादरकर्ते प्रा. विसुभाऊ बापट, साहित्याचार्य पंढरीनाथ तामोरे. पत्रकारिता व समाजसेवा: ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ तिरपणकर, प्रभाकर तोडणकर, समाजसेवक अॅड. सुनील भार्गवराम शिर्के, वैभव सुरेश कदम, अतुल तोडकरी, कृष्णा काजरोळकर.चित्रपट व अभिनय क्षेत्र: प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते कांचन पगारे, अभिनेते व निर्माते दिलीप कांबळे, अभिनेते अॅड. गौरव जयवंत पाटील. या मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यातील विविध भागांतून आलेल्या गुणवंतांना ‘स्वाभिमान लेखणी’, ‘शब्दवेध गौरव’, ‘अजेय लेखणी’, ‘कलम- रत्न’, ‘साहित्य-संस्कृती जीवनगौरव’, ‘विवेक-दीप', ‘कलागौरव’, ‘जनसेवा रक्षक’ आणि ‘निर्भीड पत्रकारिता’ यांसारख्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता, प्रियांका फणसोपकर, अभिनेता व दिग्दर्शक अविनाश घाडी, निलेश घाडी, निखिल कटारे, पत्रकार राहुल खरात, रघुनाथ ढोक, केतन भोज, छायाचित्रकार नरेंद्र भोसले आणि राहुल शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी अभिनेते अविनाश राऊत यांनी आभार मानले.

महाराष्ट्रातील गावागावांत विखुरलेल्या पत्रकारांचा शोध घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान करणे ही अत्यंत जिकिरीची बाब आहे. महेश्वर तेटांबे यांनी हे काम यशस्वीपणे साध्य केले आहे."

**— अरुण म्हात्रे (ज्येष्ठ कवी व साहित्यिक)**

"हा पुरस्कार सोहळा अत्यंत वाखाणण्याजोगा असून, तो प्रत्येक पुरस्कारार्थीला समाजासाठी अधिक जोमाने काम करण्याची नवी प्रेरणा देईल."

**— श्रीधर कीर (बोलके बाहुलाकार)**

### संघर्षातून निर्माण केली ओळख

ग्रामीण भागातील एक युवा पत्रकार म्हणून स्वतःच्या कष्टाने आणि संघर्षाने गेली तीन वर्षे 'दैनिक यश सिद्धी न्यूज'च्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सर्वसामान्य व वंचित घटकांना न्याय देण्याचे काम कमलाकर सोनकांबळे करत आहेत. त्यांच्या याच सामाजिक बांधिलकीची आणि निर्भीड पत्रकारितेची दखल घेत त्यांना या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. **-विश्वनाथ चव्हाण -पत्रकार, अक्कलकोट**



## आमदार असो वा खासदार-मंत्री, प्रोटोकॉलनुसारच पांडुरंगाचे दर्शन मिळणार

■ व्हीआयपी दर्शनाचा प्रयत्न केल्यास थेट गुन्हा दाखल होणार,

■ सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**सोलापूर :(स. गांवकरी)**

व्हीआयपी दर्शन घेण्याचा कोणी प्रयत्न केल्यास आपत्कालीन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येतील असा इशारा, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस कार्तिकियन यांनी पत्रकारांशी बोलताना दिला आहे. आमदार असो वा खासदार-मंत्री, असो कोणीही असो प्रोटोकॉलनुसारच पांडुरंगाचे दर्शन मिळणार आहे. व्हीआयपी दर्शनाचा प्रयत्न कोणी करू नये तसे केल्यास थेट गुन्हा दाखल करण्यात येणार आहे अशी माहिती ही त्यांनी यावेळी दिली. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल मंदिरात सर्वसामान्य भाविकांना झटपट आणि सुलभ दर्शन मिळावे, याकरिता 15 जुलैपासून व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. मात्र, या निर्णयाच्या पहिल्याच दिवशी मंदिरात मोठा गोंधळ पाहायला मिळाला. या नव्या नियमाचा फटका भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना बसला. तर दुसरीकडे शिवसेनेचे मंत्री मात्र लवाजम्यासह दर्शन घेऊन गेल्याने व्हीआयपी दर्शन बंदीचा पहिल्याच दिवशी बोजवारा उडाल्याचं चित्र बघायला मिळाले. दरम्यान याच व्हीआयपी दर्शनाबाबत एबीपी माझा ने दाखवलेल्या वास्तवांमुळे प्रशासन ॲक्टिव मोडवर आले आहे. व्हीआयपी दर्शन घेण्याचा कोणी प्रयत्न केल्यास आपत्कालीन कायद्यानुसार गुन्हे दाखल केले जाणार असल्याचा इशारा, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस कार्तिकियन यांनी माझाशी बोलताना दिला आहे. दरम्यान, भर पावसात पाहणीसाठी फिरत असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी पावसातच त्यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. प्रोटोकॉल नुसार राज्यातील मंत्री, आमदार, खासदार यांना व्हीआयपी दर्शन घेता येईल. मात्र यावेळी त्यांच्यासोबत दोन किंवा तीन लोकांनाच दर्शनासाठी सोडले जाणार आहे. मंत्री आणि आमदारांच्या सोबत असणारा लवाजमा मंदिरात सोडला जाणार नसल्याचा खुलासाही जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सूचनानंतर पंढरपुरात व्हीआयपी दर्शन बंदी कालपासून (15 जुलै) लागू करण्यात आली. काल पहिल्या दिवशी थोडा गोंधळ झाल्याची कबुली देताना जिल्हाधिकाऱ्यांनी आता यापुढे अतिशय कठोरपणे व्हीआयपी दर्शन बंदीची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे सांगितले.

काल (15 जुलै) पहिल्याच पावसात वाखरी येथील नवीन पुलाचा भराव खचला होता. याशिवाय पालखीतळाच्या परिसरात मोठे पाणी जमले होते. याबाबत बोलताना मुख्य पुलाला धोका झाला नसून बाजूचा भराव आता दुरुस्त करण्याचे काम पूर्ण झाल्याचे ही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. पहिल्याच पावसात वाखरी पालखीतळाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्या बद्दल बोलताना ही कामे राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून झाली असून आता पाण्याचा निचरा करण्यासाठी येथे तातडीने नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याच्या सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले. तर वारकऱ्यांच्या आगमनापूर्वी पाऊस सुरू झाला असून सोलापूर जिल्ह्याला पावसाची खूप गरज होती, असे सांगत पाऊस सुरू झाल्याने अनेक प्रश्न सुटतील असा विश्वास जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी एका टीव्ही चॅनेल शी बोलताना व्यक्त केला.

# भाजपच्या नगरसेवकांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न !

## अन्यथा सत्ताधाऱ्यांविरोधातआंदोलनाचा इशारा !




**राहुरी : (स. गांवकरी)**

राहुरी नगरपालिकेच्या सत्ताधारी गटाकडून विरोधी गटाच्या नगरसेवकांच्या वार्डमधील विकास कामात त अडथळे आणून त्यांना दुजाभावाची वागणूक दिली जात असुन कुठल्याच कामांत विचारत घेतलें जात नसल्याने शहरातील विश्वास ठेवून ज्यांनी आम्हाला निवडून दिले त्या नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे तसेच पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडुनही नगरसेवकांना दुजाभावाची वागणुक मिळत असल्याचा आरोप करत जर त्यांच्या कारभारात सुधारणा झाली नाहीं तर आम्हाला आंदोलनात्मक भुमिका घ्यावी लागणार असल्याचा इशारा भाजप पुरस्कृत परिवर्तन गटाच्या गटाच्या नगरसेविका व नगरसेवकांनी आंदोलन करण्याचा इशारा पत्रकार परिषदेत सत्ताधारी गटाला दिला आहे. स्व. शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून शहरातील १३ विविध विकास कामे मंजूर आहे मात्र याची वर्क आर्डर नाही, असा आरोप सचिन भोंगळ व सुजय काळे यांनी केला.

> आमच्या पाच नगरसेवीकांना सन्मान दिला जात नाही मिंटीग मधे आमच्या वार्डमधील कुठल्याही विकास कामा संबंधित वारंवार मुख्याधिकारी व अध्यक्ष यांच्याकडे मागणी करूनही आमच्या वार्डमधील विकास कामात कुठलीही हालचाल करण्यात येत नाही व आमच्या वार्डमधील कामे होत नाही. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. संक्रातीच्या हळदीकुंकूवाचा कार्यक्रम नगरपरिषदेच्या निधीमधून केला जातो. परंतु आमच्या पाच नगरसेविकांना जाणून बुजून या कार्यक्रमासाठी टाळले जाते. प्रत्येक वेळी आम्ही वार्डमधील विकास कामासंबंधी तक्रार अर्ज करुनही दखल घेतली जात नाही, कामा बाबत दुर्लक्ष केले जाते यामुळे वार्डमधील नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. या सर्व तक्रारींची दखल सत्ताधाऱ्यांनी घ्यावी अन्यथा आम्ही आंदोलन पुकारणार .
>
> **- प्रियांका काशिद, नगरसेविका , राहुरी नगर परिषद**

आमच्या वार्डात रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे वेळोवेळी अर्ज करतो पण दखल घेतली जात नाही नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, हे आमच्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. नगरपरिषदेच्या मागिल बाजुला ग्रामिण रुग्णालय समोर शौचालयाची दुरावस्था झाली असुन कुठलीच सोय नाही, तर अनेक वेळा विविध कामांसाठी डजनभर अर्ज दिले आहेत पण माझ्या कामाकडे दुर्लक्ष केले जाते बाकिच्या कामाला प्राधान्य दिले जाते पण आमच्या कामांना प्राधान्य दिले जात नाही असे म्हणून नगरसेविका प्रसन्ना वराळे यांनी डझन भर अर्ज केल्याची पोहोच यावेळी पत्रकार परिषदेत दाखविली. पत्रकार परिषदेत गटनेते राजेंद्र उंडे, विरोधी पक्ष नेते अरुण साळवे, यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली. शहरातीलआमचे नगरसेवक असलेल्या कुठल्याच वार्डमध्ये विकास कामांच्या बाबतीत सत्ताधाऱ्यांकडून कुठलीही हालचाल होत नाही व जाणून लिहून आमच्या नगरसेवकांचा वार्डमध्ये कामे प्रलंबित ठेवण्याचा कारभार सत्ताधारी करीत असल्याचा घनाघाती आरोप त्यांनी सत्ताधाऱ्यांवर केला असून यामध्ये सुधारणा झाली नाही तर आंदोलन उभारणार असल्याचा इशारा यावेळी पत्रकार परिषदेत दिला आहे

यावेळी परिवर्तन गटाचे गटनेते राजेंद्र उंडे, विरोधी पक्षनेते अरुण साळवे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष जेष्ठ नेते प्रकाश पारख, सचिन भोंगळ, विक्रम भुजाडी, अमोल काशीद, सुजय काळे, सुनिल पवार, सतिष फुलसौंदर, अक्षय तनपुरे, सचिन मेहेत्रे, नयन शिंगी, राजेंद्र वराळे, नगरसेविका प्रियंका काशिद, सिंधुताई डावखर, मनीषा भोंगळ, मनीषा बर्डे, प्रसन्ना वराळे, यांच्यासह दिनेश उंडे, कांतीलाल जगधने, उमेश शेळके, अजित डावखर, अरूण डौले, बाबासाहेब शिंदे, आदि उपस्थित होते.

## 'आरी वर्क (भरतकाम)' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**आळेफाटा : (स. गांवकरी)**



महिलांच्या कौशल्य विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ग्रामपंचायत वडगाव आनंद च्या वतीने युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था' यांच्या माध्यमातून वडगाव आनंद, पादिरवाडी, आळेफाटा येथील ग्रामस्थ महिलांसाठी आरी वर्क (भरतकाम) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम भारत सरकार व महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त उपक्रम असून नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या मार्गदर्शनाने राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण उपक्रमाचा उद्देश महिलांना स्वावलंबी बनविणे व त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. या प्रशिक्षणात महिलांना आधुनिक भरतकाम तंत्रज्ञान, डिझाईन तयार करणे, तसेच घरबसल्या व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे. इच्छुक महिलांची नावे ग्रामपंचायत कार्यालयात नोंदवून घेण्यात आली असून या प्रशिक्षणात १०० पेक्षा अधिक महिलांनी सहभाग घेतल्याचे दिसत आहे. प्रशिक्षणाची सुरुवात दि. २९ जून २०२६ रोजी झाली. हे प्रशिक्षण श्रीमती रेऊबाई बाळाजी देवकर, विद्यालय दुसरा मजला, या ठिकाणी चालू आहे, या उपक्रमाचे आयोजन सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, सदस्य, ग्रामपंचायत वडगाव आनंद यांच्या वतीने करण्यात येत असून परिसरातील महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जात प्रमाणपत्र प्रकरणी श्रीगोंद्यातील आमरण उपोषण स्थगित

■ प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलनाला तात्पुरती स्थगिती

**श्रीगोंदा : (स. गांवकरी)**



भटक्या विमुक्त व आदिवासी समाजातील नागरिकांच्या प्रलंबित जात प्रमाणपत्र प्रकरणांवर तातडीने निर्णय घेण्याच्या मागणीसाठी लोकअधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर सुरू करण्यात आलेल्या आमरण उपोषणाला प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर तात्पुरती स्थगिती देण्यात आली.

सन २०२४ मध्ये शासनाच्या विशेष मोहिमेअंतर्गत आयोजित शिबिरात भटक्या विमुक्त व आदिवासी समाजातील नागरिकांनी जात प्रमाणपत्रासाठी सुमारे ५०० अर्ज दाखल केले होते. मात्र दोन वर्षांनंतरही अनेक अर्ज प्रलंबित असल्याने विद्यार्थी, महिला व नागरिकांना शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, वसतिगृह प्रवेश तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

या मागणीसाठी लोकअधिकार आंदोलन संघटनेचे प्रवक्ते बापू ओहोळ, तालुकाध्यक्ष उमाताई जाधव, सामाजिक कार्यकर्ते विशाल पवार, तसेच लता उत्तम शिंदे, पल्लवी शेलार यांच्या नेतृत्वाखाली दि. १५ जुलैपासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. आंदोलनात राजश्री लष्करे, सारिका गोंडे, अशोक मोरे, गणेश तांबवे, राजू शिंदे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण आबा जाधव यांनी आंदोलनस्थळी भेट देत जाहीर पाठिंबा दिला. यावेळी बोलताना त्यांनी भारतीय संविधानाने शिक्षणाचा व समानतेचा अधिकार दिला असून, भटक्या विमुक्त व आदिवासी समाजातील पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्रे, तसेच त्यासंबंधित आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रलंबित प्रकरणांवर निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी बहुजन मुक्ती पार्टीच्या श्रीगोंदा विधानसभा पदाधिकाऱ्यांनीही आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.

तालुकाध्यक्ष उमाताई जाधव म्हणाल्या, "लता शिंदे व पल्लवी शेलार या गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने जात प्रमाणपत्रांसाठी पाठपुरावा करत आहेत. मात्र प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही झाली नाही. आंदोलनादरम्यान विद्यार्थी पाऊस आणि उन्हात बसूनही प्रशासनाने दखल घेतली नाही. त्यामुळे आम्ही आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला होता." दरम्यान, प्रांताधिकारी व तहसीलदार यांनी लेखी स्वरूपात प्रकरणांचा पाठपुरावा करून कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषणाला तात्पुरती स्थगिती दिली. मात्र, आश्वासनाची अंमलबजावणी झाली नाही तर पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## प्राथमिक आरोग्य केंद्राचे भूमिपूजन; सुजय विखे पाटील यांच्या हस्ते शुभारंभ

■ नगराध्यक्ष जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष अभय (भैय्या) शेळके, मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती; नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

शिर्डी **(स. गांवकरी)** : शिर्डी शहरातील राधाकृष्णनगर (प्रभाग क्र. ०९) येथे नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे भूमिपूजन युवा नेते तथा माजी खासदार मा. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमास शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष श्री. अभय (भैय्या) शेळके पाटील, मुख्याधिकारी मा. श्री. सतीशजी दिघे, शिर्डी नगरपंचायतीचे प्रथम नगराध्यक्ष श्री. कैलास (बापू) कोते पाटील, माजी उपनगराध्यक्ष मा. श्री. गोपीनाथ (बापू) गोंदकर पाटील, आरोग्य सभापती श्री. दिपक गोंदकर पाटील, नगरसेविका सौ. अलकाताई वाल्मीक गोतीस, तसेच शिर्डी नगरपरिषदेचे सर्व सन्माननीय सभापती, नगरसेविका, नगरसेवक आणि शिर्डीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राधाकृष्णनगर परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले गेल्यानंतर नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असून, आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि सुलभ होण्यास मोठी मदत होणार आहे. या भूमिपूजन सोहळ्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करत परिसराच्या विकासासाठी हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे मत व्यक्त केले.

## प्रशासनाचे दुर्लक्षः राजूरकरांनी स्वतःच बोलावली ग्रामसभा

शिर्डी **(स. गांवकरी)** : सरपंच व उपसरपंच होणत्याही राजकीय पक्षाला मानणारे होवोत पण तालुक्यातील राजूर ग्रामपंचायतीचा कारभार आजपर्यंत अनेकदा वादग्रस्त व अक्षेपार्ह ठरल्याचा इतिहास आहे. आता तर राजूर ग्रामपंचायतीत हा प्रकार दोन पावले आणखीनच पुढे गेला असून प्रशासन ग्रामस्थांना दाद न देता त्यांच्या मागणीपत्रानुसार अधिकृत ग्रामसभा घेण्यास तयार नाही. याचा परिणाम म्हणून राजूर ग्रामपंचायतच्या इतिहासात प्रथमच ग्रामस्थांनीच पुढाकार घेऊन शनिवारी ग्रामसभा बोलावली आहे. ग्रामपंचायतीकडे केली होती. मात्र अर्ज करूनही टाळाटाळ करीत दहा दिवस उलटूनही त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी थेट सीईओंना निवेदन देत ग्रामसभा घेण्याची मागणी केली. तेथेही अधिकृत ग्रामसभा घेण्याबाबत सकारात्मक आदेश झाले नाहीत.

## मोतीबिंदूमुक्त दृष्टीसाठी नीलेश लंके प्रतिष्ठानचा पुढाकार

■ ३२ जेष्ठ नागरिक व माता-भगिनी पुण्याकडे रवाना

■ गरजू नागरिकांना मोफत शस्त्रक्रिया, प्रवास व उपचाराची संपूर्ण जबाबदारी

**(स. गांवकरी)**



समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि जेष्ठ नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश लंके प्रतिष्ठानने लौकिकाप्रमाणे समाजोपयोगी उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत गुरुवारी ३२ जेष्ठ नागरिक तसेच माता-भगिनींना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुणे येथे रवाना करण्यात आले. आर्थिक अडचणींमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या नागरिकांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरत असून, लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा स्पष्ट दृष्टी मिळण्याची आशा दिसून येत होती. मोतीबिंदूमुळे अनेक जेष्ठ नागरिकांची दृष्टी कमी होत असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. मात्र शस्त्रक्रियेचा खर्च परवडत नसल्यामुळे अनेकजण उपचारांपासून वंचित राहतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन निलेश लंके प्रतिष्ठानने गरजू लाभार्थ्यांची निवड करून त्यांना पुण्यातील तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांकडून मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रवासाची व्यवस्था, शस्त्रक्रियेचा खर्च, आवश्यक तपासण्या, औषधोपचार तसेच इतर वैद्यकीय सुविधांची संपूर्ण जबाबदारी प्रतिष्ठानने स्वीकारली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणी उपचारांमध्ये अडथळा ठरू नयेत, याची काळजी घेण्यात आली आहे. खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश लंके प्रतिष्ठान आरोग्य, शिक्षण, सामाजिक विकास आणि जनकल्याणाच्या विविध क्षेत्रांत सातत्याने कार्यरत आहे. ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे, गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मदत करणे, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबविणे अशा विविध माध्यमांतून प्रतिष्ठान सामाजिक बांधिलकी जपत आहे. मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा हा उपक्रमही त्याच सेवाभावी कार्याचा एक महत्त्वाचा भाग मानला जात आहे. मोफत शस्त्रक्रियेसाठी पुण्याकडे रवाना होताना लाभार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी खासदार डॉ. नीलेश लंके तसेच निलेश लंके प्रतिष्ठानचे आभार व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे अनेक गरजू नागरिकांच्या आयुष्यात नव्या आशेचा किरण निर्माण होत असून, पुन्हा एकदा स्वच्छ आणि स्पष्ट दृष्टीने जीवन जगण्याची संधी मिळत असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

## सोलापुरात विहिरीमध्ये आढळली भली मोठी मगर

**सोलापूर : (स. गांवकरी)**



सोलापूरच्या मोहोळ येथे शेतकऱ्याच्या विहिरीतच मगर आढळून आली आहे या , घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून वनविभागाकडून बचाव मोहीम राबवण्यात येणार असून या मगरीचे वन विभागाच्या वतीने संवर्धन करण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात धक्कादायक घटना गडली आहे. मोहोळमधील कोरवलीत शेतकऱ्याच्या विहिरीत चक्क मगर आढळल्याची घटना समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात धक्कादायक घटना गडली आहे. मोहोळमधील कोरवलीत शेतकऱ्याच्या विहिरीत चक्क मगर आढळल्याची घटना समोर आली आहे. कोरवली गावातील संभाजी जमदाडे यांच्या शेतातील विहिरीत बुधवारी सायंकाळी मोठी मगर आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. विद्युत पंप बंद करण्यासाठी गेलेल्या संभाजी जमदाडे यांना विहिरीच्या कड्यावर मगर दिसली. त्यानंतर त्यांनी तातडीने ग्रामस्थ आणि वनविभागाला माहिती दिली आहे. मगरीला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्यासाठी वनविभागाकडून बचाव मोहीम राबवण्यात येणार आहे वनविभागाच्या हेल्पलाइनसह संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला. मात्र, बुधवारी रात्री उशिरापर्यंत बचाव पथक घटनास्थळी न पोहोचल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

# चणकापूर आश्रमशाळा ठरली स्वच्छतेची पाठशाळा!

### विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छ भारताची शपथ : डॉ. मस्के आणि स्वच्छता दूत चेतन हिरे यांच्या मार्गदर्शनाने चणकापूर आश्रमशाळेत आरोग्य जागर

**कनाशी : (स. गांवकरी)**

कळवण तालुक्यातील चणकापूर शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वच्छता व आरोग्य या विषयावर विशेष जनजागृती व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमात प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. दीपक मस्के आणि स्वच्छता दूत चेतन हिरे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक बी. एन. देवरे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, चणकापूर आश्रमशाळा ही केवळ शिस्तप्रिय शाळा नसून स्वच्छ, सुंदर आणि आदर्श शाळा म्हणून ओळख निर्माण करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचे संस्कार रुजविणे ही आजच्या काळाची गरज आहे.



मार्गदर्शन करताना डॉ. दीपक मस्के म्हणाले, स्वच्छता हा केवळ अभ्यासाचा विषय नसून ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील संस्कार आहे. ज्या विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या चांगल्या सवयी असतात, ते नेहमी निरोगी आणि आनंदी राहतात.

पावसाळ्यातील डेंग्यू, मलेरिया, अतिसार यांसारख्या आजारांपासून बचावासाठी स्वच्छ पाणी पिणे, परिसर स्वच्छ ठेवणे, हात धुणे आणि पौष्टिक आहार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

स्वच्छता दूत चेतन हिरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद, कविता आणि प्रश्नोत्तरांद्वारे वैयक्तिक स्वच्छता, प्लास्टिकमुक्त परिसर, कचरा व्यवस्थापन आणि पाणी बचतीचे महत्त्व पटवून दिले. स्वच्छ शाळा, स्वच्छ गाव आणि स्वच्छ भारत हा संदेश त्यांनी कृतीतून उतरवण्याचे आवाहन केले.

पाणी बचतीवर आधारित प्रेरणादायी कवितेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्प दिनानिमित्त जनजागृती आणि शपथ कार्यक्रमादरम्यान १६ जुलै जागतिक सर्प दिनानिमित्त सापांविषयी असले गैरसमज दूर करून सापांचे पर्यावरणातील महत्त्व पटवून देण्यात आले. साप दिसल्यास घाबरून न जाता वन विभागाची मदत घेण्याचे आवाहन करण्यात आले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि पाणी बचत यासाठी सामूहिक शपथ घेतली. या यशस्वी आयोजनासाठी उपशिक्षक प्रशांत खालकर, प्रभात पालवी, मनोहर सोनवणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कुंडलवाडीत छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन



बिलोली : (स. गांवकरी)

बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील शिवम मंगल कार्यालय येथे दि. २२ जुलै रोजी सकाळी १० वाजता देगलूर -बिलोली विधानसभचे विद्यमान आमदार जितेश अंतापूरकर यांच्या प्रमुख उपस्थित छत्रपती शिवाजी समाधान शिबीर अभियान राबविण्यात येत आहे . या शिबीरास देगलुर व बिलोली तालुक्यातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख हजर राहणार असुन सदर शिबीराच्या ठीकाणी नागरीकांचे अडीअडचणीचे निराकरणण जागेवरच करण्यात येणार आहे.तरी या शिबिराचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शीबीर अभियान हे सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न सत्वर निकाली काढणे, महाराष्ट्र जमिन महसूल संहितेच्या नवीन तरतुदींची जनजागृती करणे / प्रभावी अंमलबजावणी करणे, डिजिटल सेवांचा जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करणे, या द्वारे नागरिकांना सेवा पुरविणे या उद्देशाने राज्यात महसूल मंडळ स्तरावर तसेच नगर परिषद / नगर पंचायत पातळीवर राबविण्यात येते. महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात आलेले एक महत्त्वाचे अभियान आहे. याद्वारे शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न व तक्रारी एकाच दिवशी व एकाच ठिकाणी (मंडळ स्तर / नगरपरिषद स्तर) तडीस नेऊन 'एकाच दिवसात सेवा वितरण' देण्याचा उद्देश आहे.

तरी नागरीकांचे काही अडी अडचणी/समस्या असल्यास त्यांनी सदर अडचणी दि. २० जुलै पुर्वी सबंधीत कार्यालयाकडे सादर कराव्यात व त्याची स्थळ प्रत घेवुन दि. २२ जुलै रोजी शिबीराच्या ठिकाणी हजर राहवे म्हणजे सदर तक्रारीचे निराकरण कता येईल सदर शिबीरास जास्तीत जास्त संख्येने देगलुर व बिलोली तालुक्यातील जनतेणे उपस्थित राहवे असे अहवान करण्यात येत आहे.




**ठाणे :** दिवा परिसरातील बेतवडे गावातील शेतकऱ्यांनी मॅरेथॉन नेक्सवर्ल्ड कंपनीचे बिल्डर मयूर रमणीकलाल शहा, सागर गाला आणि त्यांच्या भागीदारांविरोधात सुरू केलेल्या बेमुदत धरणे आंदोलनाला आता राजकीय पाठिंबा गडद होऊ लागला आहे. आज शिवसेनेचे उपशहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी शेकडो शिवसैनिकांसह आंदोलनस्थळी भेट देत आंदोलक शेतकऱ्यांना शिवसेनेचा जाहीर पाठिंबा असून बाधितांना न्याय मिळवून देण्यास शिवसेना कटीबद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### सटवाजीबाबा देवस्थानास ब दर्जासाठी प्रयत्न करणार : संतोष नाना डोळस

राजगुरुनगर (स. गांवकरी) : अखंड महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेले खेड तालुक्यातील गुळाणी येथील श्री क्षेत्र सटवाजीबाबा देवस्थान येथे दिवसेंदिवस भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असल्यामुळे येथील सुखसुविधांसाठी शासनस्तरावरून अधिकचा अर्थिक निधी प्राप्त करणे भविष्यात अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी देवस्थान क दर्जात प्राप्त असून त्याचे ब दर्जात रूपांतर होणेसाठी पाठपुरवठा करणार असल्याचे मत रिपाइं(आठवले)श्रमिक ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळ्स यांनी देवस्थान भेटी दरम्यान व्यक्त केले.राज्यातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी शासनाकडून अ,ब,क दर्जा देण्यात येतो हे देवस्थान शासनाच्या क दर्जात समाविष्ट आहे भाविकांची वाढती वरदळ लक्षात घेऊन त्यासाठी रस्ते, पाणी,स्वच्छतागृहे,भक्तनिवास या सारख्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी देवस्थानाचे ब दर्जात रूपांतर करण्यासाठी ट्रस्टी बरोबर प्रयत्न करण्यास मी कटिबद्ध आहे असेही डोळस यांनी यावेळेस जाहीर केले यावेळी देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्रीफळ देऊन संतोषनाना डोळ्स यांचा सपत्नीक सत्कार करताना गुळाणी गावचे माजी सरपंच तथा देवस्थानचे अध्यक्ष दिलीपराव ढेरंगे खजिनदार राम महाराज रोडे विश्वस्त बबन महाराज कोरडे सुभाष पिंगळे भिकाजी ढेरंगे यशवंत पिंगळे रेटवडी गावचे पोलीस पाटील उत्तमराव खंडागळे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड दौरा

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे नांदेड दौऱ्यावर असून त्यांचा शुक्रवार 17 जुलै 2026 रोजी नांदेड जिल्ह्याचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहील. शुक्रवार 17 जुलै 2026 रोजी सकाळी 11.20 वा. शासकीय विश्रामगृह नांदेड येथून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सकाळी 11.30 जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे आगमन व नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत उभारलेल्या ईव्ही चार्जिंग स्टेशनच्या उद्घाटन समारंभास उपस्थिती. स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड. दुपारी 12 वा. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. स्थळ- जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड. सोईनुसार नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.

### वसरणी येथील एस आय आर मतदार नोंदणी अभियानला उत्स्फूर्त प्रतिसाद

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड तहसील व मनपा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एस आय आर मोहीमेला वसरणी येथे हनुमान मंदिर प्रांगणात आयोजित 16 जुलै 26 रोजी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून प्रभाग क्रमांक 19 मधील लोकप्रतिनिधी व सिडको क्षेत्रीय सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी भेट देऊन पाहणी केली. 16 जुलै रोजी वसरणी येथील हनुमान मंदिर प्रांगणात आयोजित एसआयआर मोहीम अभियान आयोजित करण्यात आले होते यावेळी 186 ते 191यावेळी नगरसेवक प्रतिनिधी राजु पाटील काळे, संजय मोरे ,विनोद काकडे ,संतोष मोरे, यांच्या सह निवडणूक अधिकारी अविनाश शिनगारे, व्यवस्थापक अंगद जाधव,करनिरीक्षक वसंत कल्याणकर,संजय नागापूरकर, नारायण आठवले,लिपीक ऊतम जाधव,सहशिक्षक आर.एस.स्वामी, सौ.अर्चना जोशी ,राजेश भंगे,खानापुर कर, देवकते, सहशिक्षका कांबळे,अंगणवाडी सेविका सुनिता चिंतोरे, करूणा ढवळेबाई ,अनिता चौदंते, विजयमाला बनसोडे यांच्या सह आशा वर्कर्स यांनी सहकार्य केले. यावेळी वसरणी येथील विविध भागातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोदवुण गंणना पत्र भरुन केले.यावेळी गावातील संजय लव्हेकर, सुदर्शन गजभारे, सखाराम चितळे, दिगांबर जटाळे,माधव जटाळे, यांच्या सह गावातील जेष्ठ नागरिक व युवक यांनी सहकार्य केले तर लोकप्रतिनिधी सौ.दिपाली संतोष मोरे, श्रीमती सुलोचना धोंडीबा काकडे,सौ. अनुराधा राजु पाटील काळे ,अभिषेक सौदे यांनी प्रभागातील विविध भागात एस आय आर मोहीम विविध भागात आयोजित केली आहे.

### जिल्हा मध्यवर्ती बँकेवर आ. भीमराव केराम बिनविरोध विजयी



किनवट (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत महायुतीच्या समन्वयाच्या निर्णयाला यश मिळाले असून, प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था/अधिकोष सहकारी संस्था मतदारसंघातून किनवट तालुक्याचे आमदार भीमराव केराम हे बिनविरोध निवडून आले आहेत. नामांकन अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी त्यांच्या विरोधातील सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. त्यानंतर राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण आणि खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या हस्ते आमदार केराम यांचा सत्कार करण्यात आला.

# पारनेरमध्ये 'पीएम सूर्य घर विशेष अभियानाचा उद्या शुभारंभ

## खासदार नीलेश लंके यांची उपस्थिती



पारनेर : (स. गांवकरी)

केंद्र शासनाच्या 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' अंतर्गत पारनेर तालुक्यातील नागरिकांना सौरऊर्जेचा लाभ मिळावा, वीजबिलाचा आर्थिक भार कमी व्हावा आणि प्रत्येक घर ऊर्जा स्वावलंबी व्हावे, या उद्देशाने विशेष जनजागृती व नोंदणी अभियानाचा शुभारंभ शुक्रवार (दि. १७) रोजी सकाळी १० वाजता खा. नीलेश लंके यांच्या पारनेर येथील जनसंपर्क कार्यालयात होणार आहे. या अभियानाचे उद्घाटन लोकप्रिय खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते होणार आहे.

या अभियानाअंतर्गत नागरिकांना घरगुती सौरऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून अनुदानाचा लाभ मिळणार आहे. यामध्ये १ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, २ किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि ३ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध होणार आहे. त्यामुळे घरगुती वीजबिलात बचत होण्याबरोबरच स्वच्छ, हरित आणि शाश्वत ऊर्जेच्या वापराला चालना मिळणार आहे.

खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकारातून लाभार्थ्यांचा आर्थिक सहभाग शक्य तितका कमी राहील, यासाठी आवश्यक समन्वय करण्यात आला असून, तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

दि. १७ जुलै ते १७ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण पारनेर तालुक्यात हे विशेष नोंदणी अभियान चालविण्यात येणार आहे. इच्छुक नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी करून शासनाच्या या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उद्घाटन सोहळ्यास कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, नगरपंचायतीचे लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्य, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, निलेश लंके प्रतिष्ठान, 'आपला मावळा' संघटना, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच तालुक्यातील उद्योजक, शेतकरी, युवक, महिला आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर नागरिक उपस्थित राहणार आहेत.

या अभियानाच्या शुभारंभ सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नोंदणी करावी आणि 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना'चा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बहिस्थ शिक्षण विभागाची सहविचार सभा उत्साहात संपन्न

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहिस्थ शिक्षण विभागाची सहविचार सभा मंगळवार, दि. १५ जुलै रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेस प्रमुख पाहुणे म्हणून प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार यांनी सहभाग नोंदविला. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा विभागाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारोती गायकवाड, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सभेत बहिस्थ शिक्षण विभागाच्या शैक्षणिक, प्रशासकीय तसेच परीक्षा विषयक विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अभ्यासकेंद्रांमधील समन्वय अधिक प्रभावी करणे, प्रवेश प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करणे, परीक्षा नियोजन अधिक सक्षम करणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देणे तसेच विद्यापीठाच्या धोरणे व सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, "विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी बहिस्थ शिक्षण विभागामार्फत रोजगाराभिमुख नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचा विद्यापीठाचा विचार आहे.

# शाळेतील ४१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त

राजगुरुनगर: (स. गांवकरी)

खेड तालुका एजुकेशन सोसायटी संचालित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील ४१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त.. झाल्याची माहिती विद्यालयाच्या प्राचार्या संध्या कांबळे यांनी दिली. इयत्ता पाचवीचे ११ व आठवीचे ३० विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळाली असून संयमी भोकसे ही विद्यार्थिनीने राज्य गुणवत्ता यादित तिसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकावले आहे.



पाचवी चे विद्यार्थी खालील प्रमाणे: श्रेया रोडे (२३८), कादंबरी ढवळे (२३४), आत्मी पादी (२३२), भूमी वाळुंज (२३२), शुभम कित्तुरे (२३०), रुद्र निर्मळ (२२८), सान्वी वाळुंज (२२८), तन्मय बर्डे (२२६), पार्थवी बोरकर(२२४), अनिरुद्ध कुसळे (२२२), समर्थ टोके (२१६).

आठवीचे विद्यार्थी : संयमी भोकसे (२८८,राज्य गुणवत्ता यादीमध्ये ३ री व ज़िल्हा गुणवत्ता यादीत १ली ) जिल्हा गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थी: सनया साबळे ( २७०), आयुष बोंबले (२६८), प्रणव कुडेकर (२६८), गोजिरी कोंडे (२६६), सौरभ धोत्रे (२६०), श्रावणी पवार (२५८), श्रीतेज गाडे (२५२), गुंजन पाटील(२५२), समिधा घुमटकर (२५२),सुप्रीता पाटोळे( २५०).सृष्टी रेटवडे ( २४४), निरव मुंढे (२४४), सृजूक्त दिघे( २४२), कोमल टकले( २४२), अथर्व पावसे (२४२), आरुष सुपेकर (२४०), पार्थ कोबल (२३४), सुमेधा पानसरे (२३४), रिद्धी कदम ( २३४), ओमकार निर्मळ (२३२), श्लोक टाकळकर (२३०), वेदांत पुंडे( २२८), स्वामिनी बोत्रे( २२४), सार्थक दौंडकर (२२४ ),आर्यन मांजरे (२२४ ),श्रेया मांजरे (२२२), स्वराली कातोरे (२२२), रुद्र ढोकरे( २२२), अविष्कार जाधव (२२२ ) इयत्ता पाचवी साठी नयना लोखंडे यांनी विभाग प्रमुख म्हणून काम पाहिले. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना नयना लोखंडे, स्मिता निकम, शितल ढवळे, कांचन ढोंगे, स्वाती सूर्यवंशी, सोनाली कुऱ्हाडे यांनी मार्गदर्शन केले.

# छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त करिअर संसदेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

महाविद्यालयात ३० जून २०२६ रोजी करिअर संसदेची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर १५ जुलै २०२६ रोजी आयोजित शपथविधी कार्यक्रमात संस्थेचे विश्वस्त प्रा. सुरेशजी रसाळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला विद्याशाखाप्रमुख प्रा. बाळासाहेब महारनुर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर कट्टा समन्वयक डॉ. विजय इथापे यांनी केले. त्यांनी करिअर संसदेचे उद्दिष्ट, युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील भूमिका आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी

## नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शपथविधी संपन्न




सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी जबाबदारीने कार्य करण्याची शपथ देण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सुर्यवंशी आणि डॉ. विलास सुद्रिक यांनी कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांची ऑनलाइन बैठक घेऊन विविध जबाबदाऱ्या निश्चित केल्या तसेच करिअर संसदेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सार्थक डोंबे (मुख्यमंत्री), गणेश गुप्ता (नियोजन मंत्री), करीम पठाण (कायदा व शिस्तपालन मंत्री), सानिका हेंद्रे (सामान्य प्रशासन मंत्री), तृप्ती लोखंडे (माहिती व प्रशासन मंत्री), ऋषिकेश महांडुळे (उद्योजकता विकास मंत्री), रोहित निंभोरे (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री), वैष्णवी आहेर (कौशल्य विकास मंत्री), ऋतुजा काकडे (संसदीय विकास मंत्री) आणि सार्थक भोईटे (संसद सदस्य) यांची निवड करण्यात आली.

महाविद्यालयाच्या करिअर कट्टा उपक्रमाला आजपर्यंत शासनाचे १६ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच २०२५ मध्ये उत्कृष्ट करिअर संसद पुरस्काराने गौरविण्यात आले होते. यंदाही अधिक जोमाने काम करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे, उपाध्यक्ष सौ. मेघाताई संदीप औटी, जिल्हा बँक संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, सर्व विश्वस्त, निरीक्षक सचिनराव लगड, तसेच अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्थक डोंबे व करीम पठाण यांनी केले, तर गणेश गुप्ता यांनी आभार प्रदर्शन केले.

# मंदिरांप्रमाणेच 'ज्ञानमंदिरांना' दान द्या, तरच सामर्थ्यशाली देश उभा राहील : डॉ. दत्तात्रय आहेर

गणोरे : (स. गांवकरी)

"अध्यात्मिक श्रद्धेपोटी आपण ज्याप्रमाणे पवित्र मंदिरांना दान देतो, त्याच धर्तीवर उद्याचा सुजाण भारतीय नागरिक घडवणाऱ्या जीवन शिक्षण मंदिरांना म्हणजेच शाळांनाही सढळ हस्ते दान दिले पाहिजे. जर ही ज्ञानमंदिरे भक्कमपणे उभी राहिली, तरच आपला देश खऱ्या अर्थाने सामर्थ्यसंपन्न बनेल," असे प्रतिपादन संगमनेर येथील प्रसिद्ध अंबिका मुळव्याध व भगंदर क्लिनिकचे संचालक डॉ. दत्तात्रय आहेर यांनी केले.




तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी (गणोरे) येथे आयोजित वृक्षारोपण व देणगी प्रदान समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संगमनेर रोटरी क्लबचे संचालक सुनील कडलग, डॉ. रेखा आहेर, सरपंच संतोष आंबरे, मारुती आहेर, अशोक आहेर, राजेंद्र आंबरे, दिगंबर दातीर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड यांच्या हस्ते डॉ. दत्तात्रय आहेर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

आपल्या उत्पन्नातील काही वाटा समाजासाठी खर्च करून सामाजिक भान जपणे आणि माजी विद्यार्थी म्हणून शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे, याच भावनेतून डॉ. दत्तात्रय आहेर यांनी शिंदेवाडी शाळेच्या विकासकामांसाठी ५१ हजार रुपयांची भरीव देणगी जाहीर केली व सुपूर्द केली. माजी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक एकत्र आले, तर कोणत्याही शाळेचा कायापालट होऊ शकतो, हे शिंदेवाडी शाळेने संपूर्ण तालुक्याला दाखवून दिले असल्याचे कौतुकही त्यांनी यावेळी केले.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मालपाणी नर्सरी यांच्याकडून देणगी स्वरूपात मिळालेल्या वृक्षांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. केवळ वृक्षारोपण न करता, प्रत्येक विद्यार्थी आणि पालकाने एका झाडाचे पालकत्व स्वीकारून त्याच्या संगोपनाची कायदेशीर जबाबदारी घेतली आणि तशी शपथही घेतली.

या उपक्रमाचे कौतुक करताना शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड म्हणाले की, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण काळाची गरज आहे. भविष्यात जर आपल्याला सुखी आणि निरोगी आयुष्य जगायचे असेल, तर 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश प्रत्येकाने अंगीकारायला हवा.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाळेच्या उपक्रमशील मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांनी शिंदेवाडी शाळेच्या आतापर्यंतच्या प्रगतीचा आणि कायापालटाचा सविस्तर आढावा घेतला.

या सोहळ्यात शाळेला वस्तू स्वरूपात, रोख देणगी आणि विशेष निधीच्या माध्यमातून मदत करणाऱ्या सर्व दानशूर दात्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी अरविंद आहेर , राजाराम आहेर, शिक्षण तज्ञ दत्तात्रय हांडे, संतोष भालेराव, गणेश भालेराव, श्रीकांत खतोडे, विशाल आंबरे, रावसाहेब दातीर, आकाश आंबरे, योगेश दातीर, अशोक दातीर, दत्तात्रय आंबरे, सागर चव्हाण, गोरख आहेर, प्रवीण मालुंजकर, संजय आंबरे, विवेक दातीर, वाळीबा खतोडे, प्रियंका हांडे, सुवर्णा खतोडे, शितल आंबरे, अक्षदा आंबरे , प्रियंका आहेर, ज्योती आंबरे ,माया आंबरे,अनिता हांडे, मीनाक्षी हांडे, अश्विनी दातीर, उज्वला हांडे, संजीवनी दातीर, मोहिनी शिंदे आदींसह पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या शिक्षिका कल्पना पाटील मॅडम यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 शुक्रवार दि. १७ जुलै २०२६

आवृत्ती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २१७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

## मालाड पश्चिमेत कोट्यवधींच्या जमीन घोटाळ्याचा आरोप

## बनावट कागदपत्रांद्वारे वंशपरंपरागत शेतीजमिनीवर डल्ला?

मुंबई (समर्थ गांवकरी)

**मालाड पश्चिम येथील वंशपरंपरागत शेतीजमिनीसंदर्भातील कथित कोट्यवधींच्या जमीन घोटाळ्यामुळे मालमत्ता हक्कांच्या संरक्षणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मालाड पोलीस ठाण्यात एफआयआर क्रमांक ०८७३/२०२६ दाखल झाला असून, तक्रारदार मिलिंद विजय पुरव यांनी संगनमताने फसवणूक करून बनावट कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या कुटुंबाच्या जमिनीवर बेकायदेशीररीत्या हक्क मिळवल्याचा आरोप केला आहे.**

तक्रारदार मिलिंद पुरव हे दिवंगत गणपतराव शिवराम पुरव यांचे नातू व कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या तक्रारीनुसार, वलूनाई (ता. बोरिवली, सध्याचे मालाड) येथील सर्व्हे क्रमांक १७२, १७५ आणि ६१६ या वंशपरंपरागत शेतीजमिनींना नंतर सिटी सर्व्हे क्रमांक देण्यात आले. त्यामध्ये सीटीएस क्र. ५९० (२१,६१४ चौ. मी.) आणि सीटीएस क्र. ५५३/१२ (३५३ चौ. मी.) या मालमत्तांचा समावेश असून, १९५० च्या दशकापासून पुरव कुटुंबाचा भोगवटा आणि महसूल नोंदी कायम असल्याचा दावा करण्यात आला आहे.

एफआयआरनुसार, अमेरिकन स्प्रिंग अँड प्रेसिंग वर्क्स प्रा. लि. या कंपनीने नोंदणीकृत विक्री करारांच्या आधारे प्लॉट 'ए' (सीटीएस ५५५) चा काही भाग आणि सीटीएस ५९० मधील केवळ १,२१४ चौ. मीटर क्षेत्र काही वारसांकडून विकत घेतले. मात्र, या मर्यादित व्यवहाराच्या आधारे कंपनीने संपूर्ण २१,६१४ चौ. मीटर सीटीएस ५९० आणि ३५३ चौ. मीटर सीटीएस ५५३/१२ आपल्या नावावर महसूल नोंदी करून घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, सीटीएस ५९० मधील उर्वरित २०,४०० चौ. मीटर आणि सीटीएस ५५३/१२ मधील संपूर्ण जमीन कोणत्याही वारसाने विकलेली किंवा त्याग केलेली नसतानाही महसूल नोंदींमध्ये ती कंपनीच्या नावावर दाखविण्यात आली. त्यामुळे मर्यादित विक्री करारांचा आधार घेऊन संपूर्ण कुटुंबाच्या मालकी हक्कांवर गदा आणण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात भारतीय दंड विधानातील कलम ३४, ४२०, ४६७, ४६८ आणि ४७१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कलमांमध्ये संगनमत, फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि त्यांचा वापर करणे यांसारख्या गंभीर आरोपांचा समावेश आहे.

तक्रारीत ६ एप्रिल १९५७ रोजीचे गणपतराव पुरव यांच्या नावावरील कथित कागदपत्रही संशयास्पद असल्याचा दावा करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या मते, जर १९५७ मध्ये हक्कांचा त्याग झाला असता, तर त्यानंतर वारसांसोबत नोंदणीकृत विक्री करार करण्याची आवश्यकता निर्माण झाली नसती. त्यामुळे या दस्तऐवजाची फॉरेन्सिक तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

एफआयआरमध्ये महसूल नोंद क्रमांक ११३९ (०४ मे २०१२) आणि ११६४ (२६ फेब्रुवारी २०१४) यांचाही उल्लेख करण्यात आला आहे. तक्रारदाराचा आरोप आहे की, या नोंदींच्या माध्यमातून संपूर्ण मालमत्ता कंपनीच्या नावावर दाखवण्यात आली, जरी सर्व वारसांकडून पूर्ण हक्कांचे हस्तांतरण झालेले नव्हते. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, २०१० मध्ये संबंधित जमिनीची किंमत सुमारे ८ कोटी रुपये होती, तर सध्या ती १५० कोटी रुपयांहून अधिक असल्याचा अंदाज आहे. ही जमीनच कुटुंबाची एकमेव वंशपरंपरागत मालमत्ता असल्याचे त्यांनी म्हटले असून, योग्य मोबदला किंवा कायदेशीर हक्क नाकारण्यात आल्याचा आरोप केला आहे.

तक्रारदाराने या प्रकरणाचा निष्पक्ष आणि कालबद्ध तपास व्हावा, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चौकशी करण्यात यावी, वादग्रस्त जमिनीवर स्थगिती व जप्तीची कारवाई करावी, तसेच संशयित महसूल नोंदींची सखोल चौकशी करून १९५७ मधील कथित कागदपत्राचे फॉरेन्सिक परीक्षण करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपांबाबत संबंधित कंपनीची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. तपास पूर्ण झाल्यानंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## मतदारांसाठी दिलासा! राज्यातील निवडणूक आयोगाच्या SIR मोहिमेला दहा दिवसांची मुदतवाढ

मुंबई (समर्थ गांवकरी)

मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण अभियानाला महाराष्ट्रात १० दिवसांची मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने SIR प्रक्रियेचे वेळापत्रक सुधारित केले असून, मतदारांना नोंदणी, दुरुस्ती आणि हरकती नोंदवण्यासाठी अतिरिक्त वेळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार SIR अंतर्गत मतदारांच्या घराघरात जाऊन पडताळणी केली जात आहे. या प्रक्रियेद्वारे मतदार यादीतील दुबार नावे, स्थलांतरित मतदार, मृत व्यक्तींची नावे यांची तपासणी करून पात्र मतदारांची नोंद कायम ठेवण्याचा उद्देश आहे. महाराष्ट्रात सुरू असलेल्या या अभियानासाठी मोठ्या प्रमाणावर बूथ लेव्हल ऑफिसर्स (BLO) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांना मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा इतर तपशीलांमध्ये बदल करायचा असल्यास या कालावधीत अर्ज करता येणार आहे.




SIR अभियानाचे सुधारित वेळापत्रक : BLO मार्फत घराघरात भेटी : ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ मतदार केंद्रांचे पुनर्रचना/व्यवस्थापन : ८ ऑगस्ट २०२६ प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध : १७ ऑगस्ट २०२६ दावे आणि हरकती दाखल करण्याचा कालावधी : १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ अंतिम मतदार यादी प्रसिद्ध : १९ ऑक्टोबर २०२६ या मुदतवाढीमुळे मतदारांना आवश्यक कागदपत्रांसह आपली माहिती तपासण्याची आणि त्रुटी दुरुस्त करण्याची संधी मिळणार आहे. निवडणूक आयोगाने सर्व संबंधित अधिकारी आणि राजकीय पक्षांना सुधारित वेळापत्रकाची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, नागरिकांनी SIR प्रक्रियेत सहभागी होऊन आपले नाव मतदार यादीत कायम असल्याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## पुनरीक्षण मोहीम : १०० टक्के डिजीटायजेशन केले पूर्ण

### उत्कृष्ट दोन बीएलओंचा केला सत्कार

राहुरी (समर्थ गांवकरी)



भारत निवडणूक आयोगाच्या दि. १४ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरीक्षणाचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत २९ जून २०२६ पासून गणनापत्रक वाटप व डिजीटायझेशनचे काम सुरू झालेले आहे. २२३ राहुरी विधानसभा मतदार संघात एकूण ०३ लाख २९ हजार ८९३ एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदार संख्या सर्व मतदारांना गणना पत्रक देऊन त्यांच्या माहितीचे डिजीटायझेशन दिलेल्या मुदतीत करणे बंधनकारक आहे.

२२३ राहुरी विधानसभा मतदार संघात विशेष कॅम्प घेण्यात आले. मंगळवारी २२३ राहुरी विधानसभा मतदार संघात एकूण १ लाख १५ हजार ९४१ मतदारांचे डिजीटायजेशन करण्यात आले, ही टक्केवारी ३५.१५ टक्के इतकी आहे. २२३ राहुरी विधानसभा मतदार संघातील १०० टक्के डिजीटायजेशन झालेले आहे अशा पहिल्या दोन बीएलओंना जिल्हाधिकारी डॉ पकंज आशिया यांच्या हस्ते सत्कार करून गौरविण्यात आले. यात श्री. लाजरास अण्णा कासोटे, श्री. संतोष राधाकिसन अल्हाट, यांचा समावेश आहे.

तर कामचुकार कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

काही बीएलओचे डिजीटायजेशनचे प्रमाण खूप कमी आहे. अशा बीएलओच्या कामात प्रगती दिसून न आल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा जिल्हाधिकारी यांनी दिला आहे. एसआयअर संबधीत काही अडचणी आल्यास नागरिकांनी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदारांनी आपला सर्व तपशील अचूक भरून बीएलओ यांचेकडे तत्काळ दयावा, असे आवाहने जिल्हाधिकारी डॉ पकंज आशिया यांनी केले आहे.

## संत वामनभाऊंच्या पालखीचे जामखेडला पहिले गोल रिंगण उत्साहात संपन्न

जामखेड (समर्थ गांवकरी)

जामखेड शहरालगत असलेल्या जमादारवाडी येथील संत वामनभाऊ गड येथे गुरुवारी (ता.१६) दुपारी तीन वाजता संत वामनभाऊ महाराज यांच्या पालखीचे पहिले गोल रिंगण मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

वारकरी संप्रदायाचे मूळ उगमस्थान म्हणून गहिनीनाथ गडाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे या पालखी सोहळ्याला विशेष मानाचे स्थान आहे.

गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी श्रीक्षेत्र गहिनीनाथगड येथून संत वामनभाऊ महाराज यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला.

गहिनीनाथ गड, निवडुंगा, वाहली, सावरगाव, केकानवस्ती, वनवेवाडी,मतकुळी असा प्रवास करत गुरुवारी जामखेड तालुक्यातील जांबवाडी येथे सकाळी दाखल झाली.

जामखेड शहरात आगमन होताच, तपनेश्वर येथे श्रीनागेश्वर भजनी मंडळाने टाळ मृदंग विना घेऊन भजन करत सामोरे जाऊन, दिंडीचे स्वागत केले.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिंडीचे स्वागत करत सहभागी झाले.

दरम्यान शहरात ठिकठिकाणी पालखी मार्गावर सडा रांगोळी काढून महिलांनी स्वागत केले. ठिकठिकाणी वारकऱ्यांना नागरिकांनी फळे, चहा बिस्कीट, नास्ता औषधे, पाणी व्यवस्था केली होती. शहरातील श्रीविठ्ठल मंदिरात श्रीविठ्ठल भजनी मंडळाच्या वतीने दिंडीचे स्वागत करण्यात आले. तेथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर जगदाळेवस्ती येथे पंगत झाली .

जमादारवाडी येथील संत वामनभाऊ मंदिर येथे पालखीचे आगमन झाले. यावेळी जमादारवाडी ग्रामस्थ व पंचक्रोशीच्या वतीने जामखेडचे नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी व अमित चिंतामणी यांच्या हस्ते

श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांचा सन्मान करण्यात आला व रिंगण सोहळा सुरू झाला. यावेळी आष्टीचे माजी आमदार भिमराव धोंडे तसेच परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मंदिराच्या भव्य प्रांगणात मध्यभागी पालखी रथ उभा करण्यात आला.



पताकाधारी वारकरी, विणेकरी टाळ मृदंगाच्या तालावर पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... गहिनीनाथ महाराज की जय, संत वामनभाऊ महाराज की जय , या जयघोषात भरधाव वेगाने पालखीला प्रदक्षिणा करू लागले. यावेळी भाविकांनी एकच जय जयकार केला.

वारकरी परंपरेचे खेळिया प्रकरणातील अभंग झाले. यावेळी महंत विठ्ठल महाराज यांनी स्वतः अभंग गायले या अभंगाच्या चालीवर वारकरी वेगवेगळे खेळ खेळले. अनेक पुरुष व महिला भक्तांनी फुगडीचा आनंद लुटला. यावेळी जमादारवाडी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. रिंगण सोहळ्या दरम्यान या ठिकाणी नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली होती.

जामखेड परिसरातून पंढरपूरला दररोज अनेक दिंड्या जातात. मात्र संत वामनभाऊ महाराज पालखी सोहळा हा सर्वात भव्य दिव्य सोहळा अनुभवास येतो. जमादारवाडी येथे होणारे रिंगण हे एकमेव आहे. त्यामुळे या परिसरातील भक्तगणांसाठी ही पर्वणीच ठरते. राज्यभरातून लाखो संख्येने वारकरी हे या सोहळ्यात सहभागी झाले आहेत. या रिंगण सोहळ्यानंतर पुढे जमादारवाडी येथे भोजन करून सारोळा येथे ही दिंडी मुक्कामी पोहोचली.




## रेशनिंग धान्यापासून सर्व सामान्य ग्राहक वंचित राहू नये दक्षता घ्या, ग्राहक पंचायत

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले आदिवासी तालुक्यामध्ये मे-जून महिन्याचे रेशनिंगचे धान्यू वाहतुकीच्या नावाखाली उशिरा पोहचले व जुलै महिन्याचे ही उशिरा पोहचत आसल्याबाबत यामुळे सर्वसामान्य नागरिक 'ग्राहक' धान्या पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्या बाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे नायब निवासी तहसिलदार किसन लोहरे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, सचिव राम रुद्रे, माधवराव तिटमे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की अकोले आदिवासी तालुक्यामध्ये रेशनिंगचे धान्य मे, जून, महिन्यामधील धान्य वाहतुकीच्या नावा खाली उशिरा बऱ्याच भागामध्ये पोहचले आणि



आता ही जूलै महिन्याचे धान्य अद्याप पर्यंत बऱ्याच भागामध्ये आजून पोहचले नाही.

बीपीएल, अंत्योदय, अन्नपुर्णा, प्राधान्यक्रम हे सामान्य ग्राहक, नागरिक रेशनिंग धान्यापासून वंचित राहू नये. आदिवासी भागातील सर्वात लांबच्या व पाऊस,अतीवृष्टी मधिल गावात सर्वात पहिले रेशनिंगचे धान्य पोहच झाले पाहिजे. बीपीएल, अंत्योदय,अन्नपूर्णा, प्राधान्यक्रम रेशनिंग धान्य वाहतुकीचे साधने गाड्या या मध्ये वाढ करण्यात यावी.

रेशनिंग धान्य वाहतूक एजन्सी, ठेकेदार व त्यांच्या मार्फत रेशनिंग धान्य वाहतूक नेमलेले ठेकेदार हे शासनाने ठरऊन दिलेल्या नियमाचे, नियमावलीचे पालन करीत नसल्यास त्यांना नोटीस पत्र व्यवहार अन्यथा काळ्या यादीत टाकावे.वरील सर्व बाबींकडे लक्ष घालून सर्व

सामान्य ग्राहक रेशनिंग धान्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता,दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, सचिव राम रुद्रे, माधवराव तिटमे रामदास पांडे, रजनीकांत भांगरे, ज्ञानेश्वर पुंडे, अर्जुन वैद्य, अनंत घाणे, रामदास पवार, अशोक उघडे, गंगाराम धिंदळे तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, राजेंद्र घायवट, भाऊसाहेब वाकचौरे प्रा.डॉ. सुनिल शिंदे, जालिंदर बोडके, गंगाराम धिंदळे, शांताराम दराडे,मोहन मुंढे, सुरेश गभाले, सखाराम खतोडे, राजेंद्र लहामगे, रामहरी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे,भाऊसाहेब आभाळे, दत्तात्रय मुठे,प्रदीप हासे, कैलास तळेकर, प्रमोद मंडलिक,भगवान करवर, पांडुरंग पथवे, दत्ता ताजणे, सुदाम मंडलिक आदींचे नावे आहे. निवेदनाच्या प्रती जलसंधारण मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी साहेब अहिल्यानगर, जिल्हा पुरवठा अधिकारी साहेब अहिल्यानगर.

# ग्रीन सिटी प्रोजेक्ट अंतर्गत अकराशे विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप

## शहरातील वाढते तापमान कमी करण्यासाठी झाडे लावा झाडे जगवाही संस्कृती रुजवण्याची गरज-उपमहापौर धनंजय जाधव

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

दिवसेंदिवस वातावरणातील तापमानाचे प्रमाण वाढत चालले आहे.आमच्या काळात ३६ डिग्री तापमान होते.आज ४२ डिग्री तापमान होते. पुढील दहा वर्षांनी ५० डिग्री तापमान होऊ शकते. त्यावेळेस बाहेर फिरणे देखील अशक्य होईल.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडे लावून ती संवर्धन करण्याची आवश्यकता आहे.शाळेतील मुलांनी दिलेली झाडे त्यांच्या माता-पित्यांच्या नावाने त्यांच्या घराजवळील परिसरामध्ये अंगणात लावून वर्षभर ती झाडे संवर्धन व संगोपन करावे.पुढील वर्षी पुन्हा एकदा कार्यक्रम घेऊन ज्या दहा विद्यार्थ्यांनी झाडांची निगा राखून चांगल्या पद्धतीने संगोपन केले आहे.त्यांना ग्रीन सिटी प्रोजेक्ट तर्फे पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल.

शहरातील वाढते तापमान कमी करण्यासाठी झाडे लावा झाडे जगवा ही संस्कृती रुजविण्याची गरज आहे.असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालय,दादा चौधरी मराठी शाळा,मेहेर इंग्लिश स्कूल,भाईसथ्था नाईट हायस्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांना पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ग्रीन सिटी प्रकल्प अंतर्गत १,१०० विद्यार्थ्यांना उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर,भाजपा ओबीसी चे गणेश विद्दे,हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी,कार्यकारणी सदस्या प्रा.ज्योतीताई कुलकर्णी,मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी,दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, दादा चौधरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री ठोकळ,मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य प्राध्यापिका अनुरीता झगडे, अजय महाजन,प्रसाद सामलेटी,मनोज हिरणवाळे, औटी सर आदी उपस्थित होते.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, ग्रीनसिटी प्रोजेक्ट मूळे शहरात पर्यावरणाची मोठी चळवळ उभी राहिली आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात झाडे लावल्याने पर्यावरणाचे रक्षण होऊन मोठ्या प्रमाणात पाऊस पडेल.यासाठी शाळा, महाविद्यालयातून प्रबोधन होणे गरजेचे आहे.शाळेतील विद्यार्थ्यांनी दिलेले रोपांचे वृक्षारोपण करून संवर्धन करावे.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नावाने अहिल्यानगर शहरामध्ये ग्रीन सिटी प्रोजेक्ट हरित नगर करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.ग्रीनसीटी प्रोजेक्टसाठी उपमहापौर धनंजय जाधव यांनी पुढाकार घेतला असून या उपक्रमाच्या माध्यमातून सावली देणारी फळझाडे,औषधी वनस्पती आणि स्थानिक हवामानास अनुकूल झाडे लावली जात आहेत. पर्यावरणाचे संवर्धन, हरित परिसराची निर्मिती, प्रदूषण कमी करणे आणि पुढील पिढीसाठी निरोगी व समृद्ध पर्यावरण निर्माण करणे हा मुख्य उद्देश या पर्यावरण पूरक कार्यक्रमाचा आहे.पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. ज्योतीताई कुलकर्णी म्हणाले, अडुळसा, शतावरी, तुळस, अश्वगंधा या आयुर्वेदिक रोपांचे प्रत्येकाने संवर्धन करावे.आयुर्वेदिक वनस्पती आरोग्यासाठी फलदायी असतात.



पाहुण्यांच्या परिचय उषा भालेराव यांनी करून दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वर्षा गुंडू यांनी केले तर आभार सौ.ताटी यांनी मानले.

# शिंदवड ते पंढरपूर पायी दिंडीचे श्री स्वामी समर्थ मंदिरात भव्य स्वागत

## 'वारकरी परंपरा ही समाजाला समतेसह संस्कारांची दिशा देणारी जीवनशाळा' : महापौर ज्योतीताई गाडे

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील श्रीक्षेत्र शिंदवड येथून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या श्री निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडीचे सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात भाविकांच्या वतीने अत्यंत भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.

टाळ-मृदुंगांच्या निनादात, ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठलच्या अखंड गजरात दिंडी मंदिर परिसरात दाखल होताच संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

मंदिरातील भाविकांनी दिंडीतील जिवनेश्वर काळुबाबा रथाचे पूजन करून विणेकरी हभप भाऊसाहेब मोरे यांची पाद्यपूजा केली. मंदिराच्या सेवेकरी बांधवांनी रस्त्यावर आकर्षक रांगोळ्या, फुलांची सजावट करून दिंडीचे स्वागत केले. दिंडीचे आगमन होताच फटाक्यांची





आतषबाजी करण्यात आली, तर महिलांनी रथातील पादुकांचे औक्षण करून विठ्ठलनामाच्या गजरात आरती केली. यावेळी हभप अनिरुद्ध निर्मळ, हभप भाऊसाहेब मोरे, हभप बापूभाऊ बस्ते,हभप गोविंद बस्ते,हभप विलास बस्ते, हभप नामदेव बस्ते, हभप राकेश बस्ते, भाविक उपस्थित होते.

रात्री मंदिर परिसरात समस्त शिंदवड ग्रामस्थ व वारकरी परिवाराच्या वतीने संगीत हरिपाठ सादर करण्यात आला. त्यानंतर झालेल्या कीर्तनात हभप वसंत महाराज थोरमिसे यांनी अवघा रंग एक झाला या अभंगाच्या माध्यमातून आषाढी वारीचे आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व उलगडून सांगितले.

तसेच अमोल गाडे यांनी सांगितले की वारी माणसाला स्वावलंबन, नम्रता, समता आणि आत्मपरीक्षणाची शिकवण देते. जात, पंथ, श्रीमंती-गरिबीचे भेद विसरून सर्वांना एकाच विठ्ठलभक्तीच्या सूत्रात बांधणारी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची अनमोल परंपरा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाले की आषाढी वारी ही केवळ पंढरपूरच्या दिशेने चालणारी पायी यात्रा नसून ती माणसाच्या अंतर्मनाला शुद्ध करणारी अध्यात्माची वाट आहे. वारकरी संप्रदायाने शतकानुशतके समाजात समता, बंधुभाव, शिस्त आणि सेवाभावाचे संस्कार रुजवले आहेत. टाळ, मृदुंग आणि हरिनामाच्या गजरातून समाजाला एकत्र आणण्याचे कार्य वारी आजही प्रभावीपणे करत आहे. ही परंपरा जपणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.असे सौ.गाडे यांनी स्पष्ट केले. आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात माणूस मानसिक ताणतणावात अडकत चालला आहे. अशा काळात वारकरी संप्रदाय संयम, सहकार्य, परस्पर सन्मान आणि निःस्वार्थ सेवेचे मौल्यवान धडे देतो. विठ्ठलभक्तीची ही अखंड परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेतला पाहिजे. अशा दिंड्यांचे स्वागत करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा आणि संतपरंपरेचा सन्मान करण्यासारखे आहे. असे हभप भाऊसाहेब मोरे यांनी म्हटले आहे. कीर्तनानंतर सर्व वारकऱ्यांना मिष्टान्न भोजनाचा प्रसाद देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री स्वामी समर्थ मंदिराच्या सर्व सेवेकरी बांधवांनी विशेष परिश्रम घेतले. मंदिराने केलेल्या आदरातिथ्याबद्दल शिंदवड येथील दिंडीतील वारकरी व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून आयोजकांचे आभार मानले.

# वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ वारकरी गवराज (अप्पा) रावजी आरोटे यांचे निधन!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील चितळवेढे-जामगाव येथील प्रगतशील शेतकरी, वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ वारकरी कै गवराज रावजी आरोटे/अप्पा. .यांचे, वुध्दपकाळाने राहात्या घरी निधन झाले मुंबई येथील बेस्ट सेवानिवृत्त कर्मचारी नारायण आरोटे व मोहन आरोटे यांचे वडील होत त्यांच्या पश्चात भाऊ भावजय सुना नातवंडे असा परिवार होता त्यांच्यावर वडगांव पानं येथिल अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले



त्यांच्या निधनाने आरोटे परिवारासह वारकरी संप्रदायात शोककळा पसरली आहे. साधी राहणी, अध्यात्माची आवड, वारकरी संप्रदायावरील निष्ठा आणि समाजातील सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध यामुळे अप्पा यांना परिसरात विशेष मान होता.

# आषाढी वारी निमित्त देवगड संस्थानच्यापंढरपूरमठामध्ये दि.२० जुलैं पासून नामदेव गाथा पारायण सोहळा

### श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा पालखी सोहळयानिमित्त सोमवारी पंढरपूरमध्ये क्षेत्र प्रदक्षिणा दिंडी

नेवासा (समर्थ गांवकरी)

आषाढी वारी निमित्त नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड संस्थानच्या वतीने पंढरपूर येथील मठामध्ये श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा पालखी सोहळयाच्या निमित्ताने राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली अखंड हरिनाम सप्ताह व नामदेव गाथा पारायण सोहळयाचे आयोजन दि.२० जुलै ते दि.२६ जुलै या कालावधीत करण्यात आले आहे.यानिमित्ताने सोमवार दि.२० जुलै रोजी पंढरपूर येथील मठापासून श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांची पालखी दिंडी क्षेत्र प्रदक्षिणा करण्यासाठी निघणार आहे.

पंढरपूरयेथे होणाऱ्या सात दिवशीय नामदेव गाथा पारायण व पंढरपूर क्षेत्रप्रदक्षिणादिंडी सोहळ्यासाठी भाविक हे दि.१९ जुलै रोजीपंढरपूरला जाण्यासाठी आपापल्या वाहनांनी प्रस्थान करणार आहे.या दिवशी सर्व भाविक हेपंढरपूरयेथील देवगड मठामध्ये रात्री मुक्कामासाठी जमतील.दि.२० जुलै रोजी सकाळी ७ वाजता गुरूदेव दत्त पिठाचे महंत राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरच्या देवगड मठापासून पंढरपूरनगरीत क्षेत्रप्रदक्षिणाकरण्यासाठी श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांची





पालखी दिंडी निघणार आहे.

क्षेत्रप्रदक्षिणादिंडीचे हे पाचवे वर्ष आहे क्षेत्र प्रदक्षिणादिंडीचा समारोप पंढरपूरच्या देवगड मठामध्ये करण्यात येईल त्यानंतरयेथे सात दिवशीय नामदेव गाथा पारायण सोहळयास सुरूवात होणार आहे.या सोहळयात सकाळी ४ ते ६ काकडा, आरती, सकाळी ७ ते ८ गीता पठण,९ ते ११ श्री नामदेव गाथा पठण,११ ते १२ भोजन प्रसाद,दुपारी ३ ते ५ श्री नामदेव गाथा पारायण,सायंकाळी ५.३० ते ७ हरिपाठ, आरतीनंतर भोजन, रात्री ८.३० ते १० कीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे पंढरपूर येथे होणाऱ्या गाथा पारायण सोहळ्यासाठी व्यासपीठ प्रमुख देवगडचे संतसेवक हभप नारायण महाराज ससे,हभप गणपत महाराज आहेर,हभप रामनाथ महाराज पवार, हभप संजय महाराज निथळे,मृदुंगाचार्य गिरीजीनाथ महाराज जाधव,बाळू महाराज कानडे,तात्या महाराज शिंदे,लक्ष्मण महाराज नांगरे, रोहित महाराज पटारे,गणेश महाराज तनपुरे,शशिकांत महाराज कोरेकर, सोमनाथ महाराज पानकडे यांच्यासह देवगड संस्थानचे विद्यार्थी मंडळ हे सेवा देणार आहे.या सोहळ्याची जय्यत तयारीपंढरपूर येथील देवगड मठामध्ये सुरू झाली आहे.


**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/८७/२०२६ अकोले दि.१६/०७/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे, रा. लिंगदेव**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वतः भाऊसाहेब धोंडीबा गावडे यांचा जन्म दि. ३०/०५/१९८९ रोजी (ठाकरवाडी) लिंगदेव** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **(ठाकरवाडी) लिंगदेव**, ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा संदर्भिय अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे, रा. लिंगदेव**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतः भाऊसाहेब धोंडीबा गावडे यांचा जन्म दि. ३०/०५/१९८९ रोजी (ठाकरवाडी) लिंगदेव** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **(ठाकरवाडी) लिंगदेव**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १६/०७/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

**जाहीर नोटीस**

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/ ७८४/२५ दिनांक: २९/०६/२०२६

**रहिमा खातून आबुबकर कुरेशी, मु.पो.जुन्नर**, ता जुन्नर जि पुणे **...अपिलार्थी**

**विरुद्ध......... निबंधक,** जन्म - मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी **.....प्रतिवादी**
**जुन्नर नगरपरिषद**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **रहिमा खातून आबुबकर कुरेशी,** मु.पो.जुन्नर, ता जुन्नर जि पुणे यांचा/ यांची स्वतः नामे **रहिमा खातून आबुबकर कुरेशी** यांचा / हिचा **जन्म** दिनांक **१०.०१.१९६७ रोजी मौजे जुन्नर**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ **७८४/२५** दिनांक **१०.१२.२०२५** रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २९/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर - आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

**जाहीर नोटीस**

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/ ३७६/२५ दिनांक: २९/०६/२०२६

**समीनाबी रसूल खान इनामदार, मु.पो.जुन्नर**, ता जुन्नर जि पुणे **...अपिलार्थी**

**विरुद्ध......... निबंधक,** जन्म - मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी **.....प्रतिवादी**
**जुन्नर नगरपरिषद**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **समीनाबी रसूल खान इनामदार,** मु.पो.जुन्नर, ता जुन्नर जि पुणे यांचा/ यांची स्वतः नामे **समीनाबी रसूल खान इनामदार** यांचा / हिचा **जन्म** दिनांक **०४.०६.१९६३ रोजी मौजे जुन्नर**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ **३७६/२५** दिनांक **०८.१०.२०२५** रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २९/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर - आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

**जाहीर नोटीस**

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/ ९०/२६ दिनांक: २९/०६/२०२६

**सायराबानो आबुबकर कुरेशी, मु.पो.जुन्नर**, ता जुन्नर जि पुणे **...अपिलार्थी**

**विरुद्ध......... निबंधक,** जन्म - मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी **.....प्रतिवादी**
**जुन्नर नगरपरिषद**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **सायराबानो आबुबकर कुरेशी,** मु.पो.जुन्नर, ता जुन्नर जि पुणे यांचा/ यांची स्वतः नामे **सायराबानो आबुबकर कुरेशी** यांचा / हिचा **जन्म** दिनांक **१०.०६.१९७१ रोजी मौजे जुन्नर**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ **९०/२०२६** दिनांक **०८.१०.२०२५** रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २९/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर - आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**

**जाहीर नोटीस**

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात...**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/४६५/२५ दिनांक: २९/०६/२०२६

**शेरबानो उस्मान शेख, मु.पो.बेल्हे**, ता जुन्नर जि पुणे **...अपिलार्थी**

**विरुद्ध......... निबंधक,** जन्म - मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी **.....प्रतिवादी**
**ग्रामपंचायत बेल्हे**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार **शेरबानो उस्मान शेख, मु.पो.बेल्हे**, ता. जुन्नर जि पुणे यांचा/ यांची स्वतः नामे **शेरबानो उस्मान शेख** यांचा / हिचा **जन्म** दिनांक **१०.०६.१९६८ रोजी मौजे बेल्हे**, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेले आहे. यांचा **जन्म** नोंदीचा हुकूम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ **४६५/२५** दिनांक **३०.१०.२०२५** रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २९/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर - आंबेगाव उपविभागीय मंचर (पुणे)**



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# खर्डा ग्रामपंचायतचे विभाजन करा

## सभापती प्रा.राम शिंदे यांचे ग्रामविकास सचिवांना तातडीने निर्देश!

जामखेड (समर्थ गांवकरी)

खर्डे करांची खूप जूनी व आवश्यक असि मागनी आहे. तडीस जाण्याच्या मार्गावर अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या खर्डा ग्रुप ग्राम पंचायत विभाजनाच्या प्रश्नाला अखेर मोठी गती मिळाली आहे.विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या प्रकरणात थेट लक्ष घालत,खर्डा ग्रामपंचायतचे तात्काळ विभाजन करण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांना दूरध्वनीवरून दिले आहेत. या निर्णयामुळे खर्डा परिसरातील सहा गावांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असून नागरिकांमधून या निर्णयाचे जोरदार स्वागत केले जात आहे.अनेक वर्षांचा प्रश्न सुटणार:- खर्डा ग्रामपंचायत अंतर्गत नागोबाची वाडी,मुंगेवाडी, दरडवाडी, पांढरेवाडी,गीतेवाडी आणि गवळवाडी ही गावे येतात.ही मोठी ग्रुप ग्रामपंचायत असल्यामुळे आणि येथील अफाट लोकसंख्या लक्षात घेता,मुख्य गावाव्यतिरिक्त इतर वाड्या-वस्त्यांचा आणि गावांचा विकास रखडला होता. अनेक शासकीय योजना आणि निधीपासून ही गावे वंचित राहत असल्याने येथील विकासाचा अनुशेष दिवसेंदिवस वाढत होता.हा प्रश्न इतका गंभीर बनला होता की, या संदर्भात संभाजीनगर उच्च न्यायालयात (हायकोर्ट) याचिका देखील दाखल करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी घेतली सभापतींची भेट

या पार्श्वभूमीवर,आज दिनांक १२ जुलै रोजी नागोबाची वाडी, गवळवाडी,गितेवाडी,पांढरेवाडी, मुंगेवाडी आणि दरडवाडी येथील त्रस्त ग्रामस्थांनी सभापती प्रा.राम शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेतली. ग्रामस्थांनी आपल्या तीव्र भावना आणि अडचणी मांडत खर्डा ग्रामपंचायतचे विभाजन करण्यात यावे,असे हक्काचे निवेदन त्यांना सोपवले.प्रा.राम शिंदेंची त्वरित कारवाई:- ग्रामस्थांच्या निवेदनाची आणि प्रदीर्घ मागणीची गांभीर्याने दखल घेत सभापती प्रा.राम शिंदे यांनी अजिबात वेळ न दवडता,तिथूनच थेट ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांना दूरध्वनी लावला.खर्डा ग्रामपंचायतचे विभाजन करण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी,असे कडक आणि स्पष्ट निर्देश त्यांनी मुख्य सचिवांना दिले.

सभापतींच्या या निर्देशामुळे आता लवकरच



खर्डा परिसरात प्रशासकीय फेरबदल होऊन तीन स्वतंत्र ग्रामपंचायती आकारास येणार आहेत: खर्डा गाव - स्वतंत्र ग्रामपंचायत.दरडवाडी,पांढरेवाडी, गीतेवाडी आणि गवळवाडी - ही गावे एकत्र येऊन दुसरी स्वतंत्र ग्रामपंचायत.नागोबाची वाडी आणि मुंगेवाडी - ही दोन गावे एकत्र येऊन तिसरी स्वतंत्र ग्रामपंचायत.

या विभाजनामुळे तिन्ही स्वतंत्र ग्रामपंचायतींना शासनाचा थेट आणि स्वतंत्र निधी उपलब्ध होईल,ज्यामुळे रस्ते,पाणी,वीज यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास गतीने करता येईल. आपल्या अनेक वर्षांच्या मागणीला प्रा.राम शिंदे यांच्यामुळे न्याय मिळाल्याने सर्व वाड्या,वस्त्या आणि सहा गावांतील ग्रामस्थांनी सभापतींचे जाहीर आभार मानले असून,फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंद व्यक्त केला आहे.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## नौदल प्रमुख कृष्णा स्वामीनाथन यांनी घेतली राज्यपालांची भेट



मुंबई (समर्थ गांवकरी)

भारतीय नौसेनेचे नवनियुक्त प्रमुख डमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली.

यावेळी राज्यपालांनी डमिरल स्वामीनाथन यांचे नौदल प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन केले, तसेच स्मृती चिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला.

## अल्पवयीन मुलीचे लग्न,पाच जणांवर गुन्हा !

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

देशात बाल विवाह प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असतानाही कोपरगाव तालुक्यातील करंजी ग्रामपंचायत हद्दीत असा विवाह नुकताच घडून आणल्याने या विरोधात सजग ग्रामविकास अधिकारी संदीप अशोक थोरात यांनी नितीन जयराम रामकर,जयराम पुंजाराम रामकर,सुमनबाई जयराम रामकर,रघुवीर चिंधाजी सोनवणे,सुवर्णा रघुवीर सोनवणे या पाच जणांवर कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की,भारतात 'बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६' नुसार मुलीचे कायदेशीर लग्नाचे वय १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.१८ वर्षांखालील मुलीचे लग्न केल्यास तो बेकायदेशीर आणि गुन्हा मानला जातो.१८ वर्षांखालील मुलीशी लग्न करणाऱ्या किंवा लग्नास परवानगी देणाऱ्या तसेच आयोजित करणाऱ्या प्रौढ व्यक्तीला २ वर्षांपर्यंत सक्तमजुरी आणि १ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते.हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र आहे. अल्पवयीन मुलीशी लग्न करणे आणि शारीरिक संबंध ठेवणे हा 'बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा' अंतर्गत गंभीर गुन्हा ठरत असताना कोपरगाव तालुक्यातील करंजी ग्रामपंचायत हद्दीत अशी घटना दिनाक ०९ जुलै २०२६ रोजी दुपारी ०१ वाजता घडून आली असल्याचे उघड झाले आहे. ही बाब येथील ग्रामविकास अधिकारी संदीप थोरात यांचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने पावले उचलून याबाबत कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात याबाबतची खबर दिली आहे.व या प्रकरणी आरोपी वर गुन्हा दाखल केला आहे.

## मुक्तबंदी, परिविक्षाधीन बंदीच्या सहायक अनुदानात दुप्पट वाढ

### निर्दोष बंद्यांनाही पुनर्वसनासाठी आता मिळणार ५० हजार रूपयांचे अनुदान : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई (समर्थ गांवकरी)

कारावासाची शिक्षा पूर्ण केलेले मुक्तबंदी, परिविक्षाधीन बंदी यांच्या पुनर्वसनासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत सहायक अनुदान योजना राबविण्यात येते. या बंदीवानांच्या अनुदानात दुप्पट वाढ करून ती रू.२५ हजार अनुदानावरून आता रू.५० हजार इतकी करण्यात आली आहे. तसेच या योजनेत आता, निर्दोष मुक्त झालेल्या परंतु किमान एक वर्ष शिक्षा भोगलेल्या बंदींचाही समावेश करण्यात आला असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

या योजनेचा उद्देश शिक्षा पूर्ण करून किंवा निर्दोष मुक्त होऊन समाजात परतलेल्या व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि त्यांना पुन्हा गुन्हेगारीकडे वळण्यापासून परावृत्त करणे हा आहे. तसेच मानवतेच्या दृष्टीकोनातून, किमान एक वर्ष कारावास भोगल्यानंतर निर्दोष मुक्त झालेल्या व्यक्तींनाही या योजनेचा लाभ देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या योजनेअंतर्गत सुरुवातीला रु. १,०००/- इतके आर्थिक सहाय्य दिले जात होते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने वाढ करून १४ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार ही रक्कम रु. २५,०००/- करण्यात आली. महिला व बाल विकास विभागाने अनुदानाची रक्कम रु. २५,०००/- वरून रु. ५०,०००/- करण्याची शिफारस केली होती. त्यामागील प्रमुख कारणे म्हणजे अनेक वर्षे कारावास भोगल्यानंतर मुक्त होणाऱ्या व्यक्तींचे वय साधारणतः ४० वर्षांपेक्षा अधिक असते. अशा परिस्थितीत स्वतःचा किंवा कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी अधिक भांडवलाची आवश्यकता असते. तसेच, पुनर्वसनासाठी शासनाकडून उपलब्ध असलेले हे एकमेव आर्थिक सहाय्य असल्याने त्यात वाढ करण्याबाबत शासन दर तीन वर्षांनी आढावा घेऊन आवश्यकतेनुसार सकारात्मक निर्णय घेईल, अशी माहितीही मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. गेल्या तीन वर्षांत दरवर्षी सरासरी १६२ बंदी निर्दोष मुक्त झाले आहेत. तसेच, योजनेअंतर्गत मागील तीन वर्षात दरवर्षी सरासरी १५५ मुक्तबंदी व परिविक्षाधीन लाभार्थ्यांना सहायक अनुदानाचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे भविष्यात या योजनेअंतर्गत एकूण सरासरी ३१७ लाभार्थी अपेक्षित आहेत. योजनेनुसार लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे अर्ज करायचा आहे. त्यानंतर परिविक्षा अधिकाऱ्यांचा गृह चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पात्र लाभार्थी निश्चित केले जातील. शासनाकडून मंजूर झालेला निधी आयुक्तालयामार्फत संबंधित जिल्हा कार्यालयांना वितरित केला जाईल आणि तेथून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन एकरकमी जमा केला जाईल.

## एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त मंचर आगारात वृक्षारोपण

मंचर/संतोष वळसे पाटील (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त मंचर आगारात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.या उपक्रमात दिलीप वळसे पाटील यांचे स्वीयसहाय्यक रामदास वळसे पाटील, माजी उपसभापती संतोष भोर पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमास आगार व्यवस्थापक आरिफ पटेल, सहाय्यक वाहतूक अधीक्षक पांडुरंग मुठे, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक रामभाऊ गेंगजे, आगार लेखाकार सुजाता वाव्हळ,वंदना बुरुड,अशोक चिमटे,दिगंबर पोटे, युवराज गेंगजे, प्रविण गाडेकर, निलेश औटी, संजय डेंगळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, कार्यशाळा कर्मचारी व प्रवासी उपस्थित होते.वर्धापन दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून हरित पर्यावरणाचा संदेश देण्यात आला असून, भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांसाठी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई (समर्थ गांवकरी)

अनुसूचित जाती प्रवर्गातील हिंदू खाटीक समाजातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगार, उद्योग तसेच उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळामार्फत विविध कर्ज व अनुदान योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या लाभासाठी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज महामंडळाच्या महादिशा पोर्टलवर करावेत, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

महामंडळाच्या ५० टक्के अनुदान योजनेत एकूण प्रकल्प खर्च ५०,०००/- असून त्यापैकी २५,०००/- अनुदान आणि २५,०००/- बँक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या योजनेद्वारे लघु व्यवसाय, सूक्ष्म उद्योग तसेच उपजीविकेस पूरक उपक्रमांना चालना दिली जाते.

बीज भांडवल योजनेत ५०,००१/- ते ५,००,०००/- पर्यंतच्या प्रकल्पांसाठी महामंडळाचा २० टक्के सहभाग असून त्यामध्ये जास्तीत जास्त ५०,०००/- अनुदान व बीज भांडवल ५०,०००/- दिले जाते. बँकेचा ७५ टक्के (३,७५,०००/-) सहभाग असून कर्ज बँकेच्या विद्यमान व्याजदराने उपलब्ध होते. लाभार्थ्याचा ५ टक्के (२५,०००/-) सहभाग असून कर्ज परतफेडीचा कालावधी ३ ते ५ वर्षे आहे. या योजनेमुळे लाभार्थ्यांना स्थिर व टिकाऊ व्यवसाय उभारण्यास मदत होते.

थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना १,००,०००/- पर्यंत कर्ज वार्षिक ४ टक्के व्याजदराने उपलब्ध करून दिले जाते. या योजनेत प्रकल्प खर्च १००,०००/-,

## 'व्हीबी-जी राम जी' योजनेची पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी करा : रोहयो मंत्री भरत गोगावले

### विभागनिहाय कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश

मुंबई (समर्थ गांवकरी)

'व्हीबी-जी राम जी' या नवीन योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शासन पातळीपासून गाव पातळीपर्यंतच्या संपूर्ण यंत्रणेने सतर्कता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखावे. यंत्रणेचा कोणत्याही स्तरावर गैरफायदा घेतला जाणार नाही, याची दक्षता घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिले. सर्व यंत्रणांना या योजनेची सविस्तर माहिती होण्यासाठी विभागनिहाय कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात असे निर्देशही त्यांनी दिले.

'व्हीबी-जी राम जी' योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज, आयुक्त श्रीमती अनिता मेश्राम, सहसचिव अतुल कोदे यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रशासकीय त्रुटींमुळे मजुरांची देणी थकणार नाहीत, यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले. कामांना केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधी हस्तांतरण व व्यवस्थापनाशी संबंधित प्रक्रिया विहित कालावधीत आणि पूर्ण



पारदर्शकतेने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या सर्व कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर करावीत तसेच प्रत्येक कामाचा संबंधित यंत्रणांनी नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

योजनेची माहिती सर्व संबंधित घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी यासाठी पहिल्या टप्प्यात पुढील महिन्यात विभागनिहाय कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे, असे निर्देश मंत्री गोगावले यांनी दिले. या कार्यशाळांमध्ये संबंधित यंत्रणा, गावपातळीवरील लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांचा सहभाग असणार आहे. त्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरावर अशा कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

कोकण विभागाची भौगोलिक परिस्थिती आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन योजनेतील कामांच्या स्वरूपात आवश्यक ते अनुषंगिक बदल करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. योजनेची अंमलबजावणी स्थानिक परिस्थितीनुसार अधिक परिणामकारक होईल, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना मंत्री गोगावले यांनी यावेळी दिल्या.

## ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी बालगृहांची सुविधा उपलब्ध करा : महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

### मुलींचे शिक्षण, बालविवाह रोखण्यासाठी सकारात्मक कार्यवाहीचे निर्देश

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यातील ऊसतोड कामगार स्थलांतरित होत असताना त्यांच्या मुलांना संबंधित जिल्ह्यांतील बालगृहांमध्ये तात्पुरता निवारा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

राज्यातील बालगृहांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, बालगृह उपलब्ध करून दिल्यास स्थलांतराच्या काळात मुलांचे, विशेषतः मुलींचे शिक्षण अखंडित राहिल आणि बालविवाहाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, ऊसतोड कामगारांना दिलासा मिळेल. परभणी, वाशिम, जालना, बीड आदी ऊसतोड कामगारांचे स्थलांतर अधिक असलेल्या जिल्ह्यांमध्ये या मुलांसाठी बालगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करावी. तसेच बंद असलेली बालगृहे, विशेषतः मुलींसाठी, पुन्हा सुरू करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देशही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे दिले.

राज्यातील बालगृहांच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक तीन ते सहा महिन्यांनी एका महसुली विभागातील बालगृहांची तपासणी दुसऱ्या महसुली विभागातील अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी, असे निर्देशही मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्याअंतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रित, विशेष काळजीची गरज असलेली एचआयव्ही/एड्स बाधित, संकटग्रस्त व अत्याचारग्रस्त बालकांना बालगृहांमध्ये दाखल करण्यात येते.

## शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे मिळण्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करणार : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध व्हावे, निकृष्ट अथवा बनावट बियाण्यांमुळे त्यांचे नुकसान होऊ नये आणि बियाणे उत्पादन, साठवणूक, तपासणी व विक्री प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण व्हावे, यासाठी सर्व संबंधितांच्या सूचनांचा विचार करून राज्य शासन सर्वसमावेशक धोरण तयार करणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

मंत्रालयात बियाणे तपासणीच्या उत्तरदायित्वाच्या कार्यपद्धतीत (डजझ) बदल करून नवीन मानक कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस दूरदृश्यप्रणालीव्दारे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार भास्कर जाधव, कैलास घाडगे पाटील, हेमंत ओगले, हरीश पिंपळे, सुमित वानखेडे, रणधीर सावरकर, समीर कुणावार, राजेश बकाने, सई प्रकाश डहाके, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप स्वामी, कृषी संचालक सुनिल बोरकर, उपसचिव संतोष कराड उपस्थित होते.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत उत्तरदायित्व निश्चित करणे, शेतकऱ्यांचा विश्वास वाढविणे आणि बियाणा व्यवस्थेतील प्रत्येक टप्पा अधिक सक्षम करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. यासाठी साथी पोर्टलचा प्रभावी वापर, क्यू आर कोडद्वारे बियाण्यांचा मागोवा, स्त्रोत बियाण्याची पडताळणी, खासगी प्रक्रिया केंद्रांची नोंदणी, सरकारी



प्रयोगशाळांमध्ये नमुने जमा करणे, नमुने लवकरात लवकर तपासण्यावर भर, ई-लॅब आणि कोड प्रणालीद्वारे पारदर्शक तपासणी, ग्रो आउट टेस्ट सारख्या आधुनिक पद्धतींचा वापर, तसेच परराज्यातून येणाऱ्या बियाण्यांवर विशेष तपासणी यासारख्या उपाययोजनांचा नव्या धोरणात समावेश करण्यात येणार आहे.

कृषी मंत्री म्हणाले की, शेतकऱ्यांच्या बियाणेविषयक तक्रारींवर तातडीने कार्यवाही, तपासणी प्रक्रियेत पारदर्शकता, गुणवत्ता नियंत्रण अधिक प्रभावी करणे आणि निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर आणि प्रशासकीय उपाययोजनांचा नव्या धोरणात समावेश करण्यात येईल. शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत सर्व संबंधितांच्या सूचना व शिफारशींचा अभ्यास करून अंतिम धोरण तयार करण्यात येईल. समिती सदस्यांनी दिलेल्या अभिप्रायांचा नवीन धोरणामध्ये समावेश केला जाईल असेही ते म्हणाले.